आला आला पाऊस आला..
रेनकोट / 2 in1 जर्किन
लहान मुलांपासून सर्वांसाठी
Branded Zeel/Boss/Only One Complete Range
आता पुण्यात सुद्धा..
जरीवाला
कापड बाजार, फोन नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अ.नगर
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडीकल शेजारी, पुणे. मो. 7775089505



संस्थापक के. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, सोमवार दि. १८.०८.२०२५ | अंक नं. ११८ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020



SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अ‍ॅण्ड मार्बल इंडस्ट्रिज

स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदी | खरेदीवर पॉईंट | पॉईंटसवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

बाप्पाच्या स्वागतासाठी आपण सज्ज व्हा,
सजविण्यासाठी आम्ही सज्ज आहोत..
बाप्पाला सजविण्यासाठी 500 पेक्षाही अधिक डिझाईनमधील चांदीच्या आकर्षक मुर्ती व दागिने
चंदुकाका ज्वेल्स
सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02


# कालिका फर्निचरच्या दुकानाला आग; एकाच कुटुंबातील ५ जणांचा दुर्दैवी मृत्यू

नगर – नेवासा फाटा परिसरात कालिका फर्निचर या दुकानाला १७ ऑगस्ट रोजी मध्यरात्री लागलेल्या आगीत एकाच कुटुंबातील ५ जणांचा गुदमरून मृत्यू झाला. रात्री १ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. आगीचा भडका इतका तीव्र होता की, कुटुंबीयांना बाहेर पडण्याची संधीदेखील मिळाली नाही.



दुकानाच्या मागील बाजूस वास्तव्यास असलेल्या मयूर अरुण रासने (वय ३६) यांचे कुटुंब आगीच्या भक्ष्यस्थानी सापडले. यात मयूर यांच्यासह त्यांची पत्नी पायल (वय ३०), दोन लहान मुले अंश (वय ११) व चैतन्य (वय ६) आणि वयोवृद्ध आजी सिंधुताई चंद्रकांत रासने (वय ८५) यांचा जागीच मृत्यू झाला. तर यश किरण रासने (वय २५) हा गंभीर जखमी असून त्याची प्रकृती स्थिर असल्याची माहिती मिळाली आहे. दरम्यान, मयूर यांचे वडील अरुण रासने व त्यांची पत्नी हे त्या दिवशी मालेगाव येथे नातलगांकडे गेले होते, त्यामुळे ते बचावले.

आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. मात्र, प्राथमिक तपासात शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. दुकानात मोठ्या प्रमाणात लाकडी फर्निचर, गाद्या, व इतर ज्वलनशील साहित्य असल्याने आगीने काही क्षणांतच विक्राळ रूप धारण केले. स्थानिकांनी आरडाओरड


*(पुढील मजकूर व छायाचित्र पान २ वर)*



पुरुषांसाठी ब्रॅण्डेड शर्ट
(3XL, 4XL पर्यंत) Rs.550/- ला 1 Rs.1500/- ला 3
(2XL, 3XL, 4XL पर्यंत) Rs.400/- ला 1 Rs.1100/- ला 3
जिन्स व फॉर्मल पॅन्ट साईज ३४ पर्यंत Rs.1200/- ला 3 व साईज 36 पासून पुढे Rs.1500/- ला 3, मर्यादित स्टॉक
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल पुरुषांसाठी सर्व काही शुभ मॉल
मयुरी लेडिज मॉलच्या वर


## जिल्ह्यात विजांच्या गडगडाटासह पाऊस

### १९ ऑगस्टपर्यंत हवामान खात्याचा यलो अलर्ट

नगर – जिल्ह्यात १९ ऑगस्टपर्यंत वीजांच्या गडगडाटासह हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस व तुरळक ठिकाणी सोसाट्याचा वारा वाहण्याचा अंदाज भारतीय हवामान खात्याने वर्तविला आहे. जिल्ह्यासाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला असून नागरिकांनी दक्षता घ्यावी, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी दादासाहेब गिते यांनी केले आहे.

भिमा नदी (दौंड पूल) ३०४४ क्युसेक, सीना नदी (सीना धरण) २६९ क्युसेकने विसर्ग सुरु आहे. पुणे, नाशिक व अहिल्यानगर जिल्ह्यांत मध्यम ते मुसळधार पाऊस झाल्यास भिमा, प्रवरा, गोदावरी, घोड, सीना तसेच मुळा धरणातून होणाऱ्या विसर्गामुळे नद्यांची पाणीपातळी वाढू शकते. मुळा नदीपात्रातील कोतूळ येथून पाण्याचा विसर्ग सुरू असल्याने नदीकाठावरील नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

जिल्हा प्रशासनाने नागरिकांना पुढील दक्षता घेण्याचे आवाहन केले आहे. मेघगर्जना, वीजा किंवा वादळी वाऱ्याच्या वेळी झाडाखाली किंवा त्याजवळ थांबू नये, सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा., वादळादरम्यान विद्युत उपकरणे वापरू नयेत व वीजेच्या सुवाहक भागांपासून दूर राहावे., मोकळे मैदान, टॉवर, विद्युत खांब, धातूची कुंपणे, लटकणाऱ्या केबल्स यांपासून दूर राहावे., जाहिरात फलकांच्या आसपास थांबू नये., मोकळ्या जागी असल्यास गुडघ्यावर बसून डोके व कान झाकावे., धरण व नदी परिसरात पर्यटनासाठी जाऊ नये, पाण्यात उतरू नये व धोकादायक ठिकाणी सेल्फी काढू नये., नदी, ओढा, नाले काठावरील नागरिकांनी पाणीपातळी वाढल्यास त्वरित सुरक्षित स्थळी स्थलांतर करावे, पाण्यावरून वाहणारे पूल ओलांडू नयेत., मोडकळीस आलेल्या इमारतींमध्ये थांबू नये., अतिवृष्टीमुळे भूस्खलनाची शक्यता असल्याने डोंगरपायथ्याशी राहणाऱ्यांनी वेळीच स्थलांतर करावे, घाटरस्त्याने प्रवास टाळावा., शेतीमाल व जनावरांचे संरक्षण करण्यासाठी योग्य नियोजन करावे. आपत्कालीन परिस्थितीत नजीकच्या पोलीस ठाणे किंवा तहसील कार्यालयाशी संपर्क साधावा. जिल्हा नियंत्रण कक्ष दूरध्वनी – १०७७ (टोल फ्री), ०२४१-२३२३८४४, २३५६९४० उपलब्ध आहेत.


मा.ना.श्री.राधाकृष्णजी विखे पा. पालकमंत्री, अहिल्यानगर
मा.श्री.सुजयदादा विखे पा. मा. खासदार
मा.श्री.दिलीपजी भालसिंग दक्षिण जिल्हाध्यक्ष, भाजपा, अ.नगर
मा.श्री.अनिलजी मोहिते शहर जिल्हाध्यक्ष, भाजपा, अ.नगर
भारतीय जनता पार्टीच्या शहर जिल्हा चिटणीसपदी श्री.मिलिंद भालसिंग
व वकिल सेलच्या अध्यक्षपदी अ‍ॅड.चंदन बारटक्के
यांची निवड झाल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन
शुभेच्छुक
श्री संस्कृती मित्र मंडळ, वाडियापार्क मॉर्निंग ग्रुप
छत्रपती ग्रुप- अ.नगर, गुड मॉर्निंग ग्रुप- अ.नगर,
सारस कॉलनी, रविश कॉलनी, अहिल्यानगर
शहर जिल्हा भारतीय जनता पार्टी, अहिल्यानगर


## गंज बाजारातील सुवर्ण कारागिराच्या दुकानातून ४ लाख ८० हजारांचे सोने घेवून कामगार पसार

नगर – गंजबाजार भागातील सुवर्ण कारागिराच्या दुकानात काम करणारा कामगार दुकानातून ४ लाख ८० हजार रूपयांचे सोन्याचे दागदागिने घेऊन पसार झाल्याची घटना उघडकीस आली आहे.

याबाबत रमजान सलाम पीयादा (वय ३७, रा. धरती चौक) यांनी फिर्याद दिली आहे. रमजान यांचे गंजबाजार भागात रमजान पॉलिश अ‍ॅण्ड कारागीर नावाचे सोने पॉलिशिंगचे दुकान आहे. त्यांनी गेल्या महिनाभरापासून शेख अरमान अली (रा. कोमलासागर, हुगली, पश्चिम बंगाल) याला कारागीर म्हणून कामावर ठेवले होते. अरमान हा दुकानाजवळच भाडोत्री खोलीत वास्तव्यास होता. १५ ऑगस्ट रोजी सकाळी रमजान व अरमान दोघेही दुकानात कामाला हजर झाले होते. दुपारी साडेबारा वाजता रमजान नमाज पढण्यासाठी बाहेर गेले. मात्र १५ मिनिटांत परतल्यानंतर दुकानाचा दरवाजा उघडा, सोन्याचे दागिने ठेवलेला ड्रॉवर रिकामा आणि अरमान गायब असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्याचा मोबाईलही बंद असल्याने त्यांनी त्याच्या राहत्या खोलीत धाव घेतली, मात्र तो तेथेही मिळून आला नाही. अरमानने दुकानातून प्रत्येकी १२ ग्रॅम वजनाचे ५ सोन्याचे नेकलेस, २३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे पट्टी व काळ्या मण्यांचे गंठण, प्रत्येकी १० ग्रॅम वजनाच्या ४ जोड सोन्याच्या पळ्या, अशा प्रकारे एकूण ४ लाख ८० रूपये किंमतीचे सोन्याचे दागिने घेऊन अरमान पसार झाला आहे. या बाबत कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद देण्यात आली असून, पोलिसांनी संशयित आरोपी अरमान शेख याच्याविरूध्द कोतवाली पोकिलस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.


महाराष्ट्रातील सर्वात स्वस्त कापड मॉल महावीर मॉल
स्वस्त म्हणजे नक्की काय असतं..?
रेनकोट आणि छत्री महोत्सव
पावसाळ्याची तयारी करुया
झील आणि वर्षा रेनकोटवर सरसकट 20% डिस्काउंट
रेनकोट खरेदी करा आणि अधिकचा डिस्काउंट मिळवा..
सर्व फ्रेश स्टॉक, नवीन डिझाईन रेडी स्टॉकमध्ये उपलब्ध
सर्व शालेय मुलांचे सॅक वाले रेनकोट मिळतील.
लेडीज रेनकोट मिळतील.
अधिक माहितीसाठी भेट द्या. श्री महावीर कलेक्शन
मारुती मंदिरा समोर, मर्चंट बँके जवळ, मार्केटयार्ड, अ.नगर. Mo. 98222 52001

भांड्यांवर पांढरे डाग पडत आहेत?
मग आजच घरी आणा अत्याधुनिक इलेक्ट्रोमॅग्नेटिक वॉटर कंडिशनर
जे बनवते जड व क्षारयुक्त पाण्याला शुद्ध!
Satbhai Mala, Shop No 8, Delhi Gate Rd, Near Gajanan Hospital, Ahilyanagar
9145008009 / 9822542011
ABHAY SALES CORPORATION & HARDWARE

CERTIFICATE COURSE IN ADVANCE ACCOUNTING
COURSE DETAILS
COMPUTER APPLICATION | TAXATION, BANKING
ADVANCE ACCOUNTING | AUDITING
Experience Faculties | 1 Lac + Students Trained | Job Assistan
CAA IS NOT JUST A COURSE BUT A GREAT INVESTMENT IN YOUR CAREER
An ISO 9001:2015 Certified DiSHA COMPUTER INSTITUTE
100% JOB ASSISTANCE
Delhi Gate Branch: 1st Floor, 204, Anand Keshav Heights, Above Supekar Medical, Delhi Gate. 9371051769
Old ST stand Branch: 1st Floor, Amber Plaza, Near Lokmanthan Office, Near Maliwada Stand, Station Road. 9371151769
Pipeline Branch: Second Floor, Rucha Garden, Bhistbag Chowk, Pipeline Road. 7447761769

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# नगर-पुणे महामार्गावर चाकू, कोयत्याच्या धाकाने पुन्हा प्रवाशांना लुटले; १.७६ हजारांचा ऐवज लंपास

## दोन दिवसांतील दुसरी घटना; लुटारूंचे पोलिसांना मोठे आव्हान

नगर - नगर- पुणे महामार्गावर चास घाटात एकाच रात्री ३ वाहन चालकांना मारहाण करत लुटल्याची घटना ताजी असताना १६ ऑगस्ट रोजी पहाटे पुन्हा दोन चोरट्यांनी चाकू व कोयत्याचा धाक दाखवून प्रवाशांना लुटल्याची घटना घडली. या घटनेत रोख रक्कम, सोन्या- चांदीचे दागिने असा सुमारे १ लाख ७६ हजार ५० रूपयांचा ऐवज लुटला गेला असून, नगर तालुका पोलिसांनी जबरी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत रामदास गोविंदराव पवार (वय ५४, रा. देवठाणाखाम, ता. मालेगाव, जि. वाशिम) यांनी फिर्याद दिली आहे. रामदास पवार हे आपल्या कुटुंबीय व नातेवाईकांसोबत पुण्याकडे जात होते. रात्री दोन वाजता कृष्णाई हॉटेल, चास (ता. अहिल्यानगर) शिवारात त्यांना लुटण्यात आले. तसेच त्यानंतर पहाटे तीनच्या सुमारास बायपास रोडवरील अरणगाव ब्रिज परिसरात दोघांनी इतर काही प्रवाशांच्या वाहनांना अडवले. कोयता व चाकू दाखवत त्यांनी प्रवाशांकडील रोख रक्कम तसेच सोन्या-चांदीचे दागिने जबरदस्तीने लुटून नेले.

फिर्यादी पवार यांच्यासह इंद्रजित घुगे, आकाश चंदनशिव, आरती शिंदे यांच्याकडील १० हजार ५० रूपयांची रोख रक्कम, उषाबाई पवार, आरती शिंदे, सरला पवार, पायल जाधव, मालाबाई राठोड यांच्याकडील सुमारे चार तोळ्याचे दागिने व मालाबाई राठोड यांच्याकडील ८० ग्रॅमचे चांदीचे दागिने असा एकुण १ लाख ७६ हजार ५० रूपयांचा ऐवज लुटला आहे. घटनेची माहिती मिळताच प्रभारी उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती, सहायक पोलीस निरीक्षक प्रल्हाद गिते, उपनिरीक्षक प्रल्हाद पतंगे व ई. बी. आव्हाड यांनी घटनास्थळी धाव घेतली. संशयित चोरट्यांचा शोध पोलिसांनी सुरू केला आहे.

### महामार्गावर रात्रीची गस्त वाढविण्याची मागणी

नगर-पुणे महामार्गावरून प्रवास करताना चास शिवारात प्रवाशांना अडवून लुटले जाते. याठिकाणी वारंवार घटना घडत असून नगर तालुका पोलिसांनी रात्रीच्यावेळी सदर ठिकाणी गस्त वाढवावी अशी मागणी होत आहे. दरम्यान, लुटीच्या घटना थांबायला तयार नाही. दुसरीकडे तालुका पोलिसांसह स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना देखील या गुन्ह्यातील संशयित आरोपी मिळत नसल्याने प्रवाशांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे. प्रवाशांनी रात्रीच्यावेळी प्रवास करताना अंधारात थांबू नये, सुरक्षीत ठिकाणी थांबावे, प्रवासात काळजी घ्यावी असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

## बाबासाहेब रासकर यांचे हृदयविकाराने निधन

नगर - माळीवाडा येथील बारातोटी कारंजा परिसरातील



रहिवासी बाबासाहेब राधाकिसन (बबनराव) रासकर (वय ५०) यांचे १८ ऑगस्ट रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे आई, पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, ३ भाऊ, भावजय, १ बहिण, मेहुणे, पुतणे असा परिवार आहे. बारातोटी कारंजा येथील रासकर फर्मचे ते संचालक होते. आसाराम, सुरेश, भगवान रासकर यांचे ते मोठे बंधू होत.

## रमेश तनवानी यांचे दु:खद निधन

नगर - लोढा हाईटस् येथील पिंकी हॅण्डल्यूम फर्मचे संचालक



रमेश नानुमल तनवानी (वय ७२) यांचे १६ ऑगस्ट रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

रमेश तनवानी हे येथील सिंधू नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन होते. सिंधी जनरल पंचायत ट्रस्टचे खजिनदार होते तसेच सिंध हिंद सेवा मंडळाचे सचिव होते तसेच अनेक सामाजिक संस्थांशी त्यांचा निकटचा संपर्क होता. त्यांच्या पश्चात पत्नी, १ मुलगा, सुन, २ विवाहित मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## आशा कदम यांचे हृदयविकाराने निधन



नगर - शितल कॉलनी, गोविंदपूरा येथील आशा धनराज कदम (वय ६३) यांचे १८ ऑगस्ट रोजी हृदयविकाराने निधन झाले.

त्यांचा दफनविधी बुऱ्हाणनगर येथील दफनभूमीत करण्यात आला. त्यांच्या मागे २ मुले, १ मुलगी, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे. अलोक व प्रभाकर कदम यांच्या त्या मातोश्री होत.



छत्रपती संभाजी महाराजांचा पुतळा लवकरात लवकर विराजमान करा मागणीसाठी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पा. यांना निवेदन देताना अखिल भारतीय छावा संघटनेचे पदाधिकारी.

# छत्रपती संभाजी महाराजांचा पुतळा लवकरात लवकर विराजमान करा

## अखिल भारतीय छावा संघटनेचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना निवेदन

नगर - शहरातील प्रोफेसर चौक येथे छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्यासाठी उभारण्यात आलेल्या चौथऱ्याचे काम पूर्ण झाले असूनही अजूनपर्यंत पुतळा विराजमान करण्यात आलेला नाही. या कामातील दिरंगाईबद्दल अखिल भारतीय छावा संघटनेच्या वतीने पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना निवेदन देण्यात आले. यावेळी महिला जिल्हाध्यक्ष सुरेखाताई सांगळे, जिल्हा अध्यक्ष रावसाहेब काळे, दत्ताभाऊ वामन, मीनाक्षी धामणे, प्रतिभा भिसे, शिवाजी वेताळ, भगवान काटे, श्रीधर शेलार, विनोद साळवे, पिंटू पवार यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, प्रोफेसर चौकात उभारण्यात आलेल्या चौथऱ्याचे संपूर्ण काम काही महिन्यांपूर्वी पूर्ण झाले असून पुतळा विराजमान करण्यासाठी लागणारी प्रक्रिया रखडली आहे. मनपा अभियंता पारखे यांच्या कामकाजातील दिरंगाईमुळे हे काम अजूनही प्रलंबित आहे. सदर कामाची मुदतही संपली असून, नागरिकांमध्ये नाराजी पसरली आहे. म्हणूनच पालकमंत्र्यांनी लक्ष घालून मनपा प्रशासनाला आवश्यक ते निर्देश द्यावेत व छत्रपती संभाजी महाराजांचा पुतळा लवकरात लवकर विराजमान करावा, अशी मागणी छावा संघटनेतर्फे करण्यात आली.

# १५ ऑगस्टला मनपावर कचरा भेट आंदोलन

नगर - शहरातील चौका चौकात होणारे अतिक्रमण, तसेच ३२ हॉस्पिटल, ४१ ओढे व नाले, बंद सिग्नल अशा विविध प्रश्नांबाबत दिलेले निवेदन व वेळोवेळी निदर्शनास आणून दिलेल्या बाबी यावर अहिल्यानगर महानगरपालिकेकडून अद्याप कारवाई न झाल्याने तसेच अधिकाऱ्यांकडून गेल्या वर्षभरात दिलेल्या निवेदनाची दखल न घेतल्याने व थातुरमातुर लेखी उत्तर शिपाई हाती दिल्याने १५ ऑगस्टला मनपावर लोकशाही मार्गाने कचरा भेट आंदोलन शिव राष्ट्र सेना पक्षाच्या वतीने करण्यात आले. कारवाई न झाल्यास पुढील आंदोलन पालकमंत्री यांच्याकडे करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला.



शहरातील नागरी समस्यांची दखल न घेतल्याने शिव राष्ट्र सेना पक्षाच्या वतीने मनपावर लोकशाही मार्गाने कचरा भेट आंदोलन करण्यात आले.



## आरपीआय नेते डॉ. राजेंद्र गवई यांची जिल्हा परिषदत उपोषणस्थळी भेट

जिल्हा परिषदेच्या आवारात व नव्या इमारतीत साफसफाईच्या कामासाठी मागवलेल्या निविदांमध्ये गंभीर गैरप्रकार झाल्याचा आरोप करत, विश्वास इंटरप्राईजेसचे प्रमुख रोहित आव्हाड यांनी जिल्हा परिषद कार्यालयात आमरण उपोषण सुरू केले आहे. उपोषणाच्या चौथ्या दिवशी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया पक्षाचे राष्ट्रीय नेते डॉ. राजेंद्र गवई यांनी उपोषण स्थळी भेट देऊन माहिती घेतली. या वेळी सुशांत म्हस्के, दानिश शेख, हरीश आल्हाट, अतुल शिंदे, नितीन कदम, गुलाम शेख, जीवन कांबळे, सागर साळवे, सागर विधाते, सतीश कांबळे, राहुल आल्हाट, जय कदम आदी उपस्थित होते.

## आशाबाई गांधी यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर - सोनेवाडी रोड केडगाव येथील रहिवासी



श्रीमती आशाबाई छगनलाल गांधी (डोणगाववाला) (वय ८३) यांचे १८ ऑगस्ट रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर केडगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ मुलगा, १ मुलगी, १ भाऊ, चुलत भाऊ, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## फकीरा पाटोळे यांचे दु:खद निधन

नगर - रेल्वे ब्रिज जवळील सुखकर्ता कॉलनीतील रहिवासी



फकीरा भागजी पाटोळे (वय ७७) यांचे १६ ऑगस्ट रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्यावर रेल्वे स्टेशन रोड येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. बाळासाहेब व नानासाहेब यांचे ते वडील होत.

## सुमनबाई चोरबले यांचे हृदयविकाराने निधन



नगर - कडा येथील रहिवासी श्रीमती सुमनबाई फुलचंद चोरबले (वय ८४) यांचे १७ ऑगस्ट रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर विश्रांतवाडी (पुणे) येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे ३ मुले, २ मुली, सुना, जावई असा परिवार आहे.

## शकीला शेख यांचे अल्प आजाराने निधन

नगर - माताजीनगर, रेणुकामाता मंदिर जवळील रहिवाशी



शकीला वजीर शेख (वय ४७) यांचे अल्प आजाराने १५ ऑगस्ट रोजी पहाटे निधन झाले. त्यांचा दफनविधी बोल्हेगाव फाटा येथील कब्रस्तान मस्जिद येथे करण्यात आला. त्यांच्यामागे १ मुलगी, जावई, १ भाऊ, भावजय, आई, वडील असा परिवार आहे. जागतिक आरोग्य सल्लागार जबिन रियाज शेख यांच्या त्या आई होत.

## वंदनाबाई कटारिया यांचे अल्प आजाराने निधन



श्रीरामपूर - लक्ष्मीनारायणनगर, वॉर्ड नं.१, गोंधवणीरोड येथील रहिवासी सौ.वंदनाबाई चंद्रभान कटारिया (वय ६२) यांचे अल्प आजाराने निधन झाले.

सोनार लेन येथील सरस्वती सुपारीचे मालक चंद्रभान कटारिया यांच्या पत्नी, मोतीलाल, सुरेश व मुकेश कटारिया यांच्या भावजई होत

# स्मशानभूमीच्या दुरावस्थेवरून संताप; ग्रामपंचायतीला टाळे ठोकण्याचा इशारा

## मंजूरी मिळूनही एक महिन्यापासून काम रखडले, अंत्यविधीसाठी ग्रामस्थांना सहन करावी लागते अमानवीय परिस्थिती



नगर - नगर तालुक्यातील नागरदेवळे गावातील स्मशानभूमीची दयनीय अवस्था ही ग्रामस्थांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न बनला आहे. पावसाळ्यात अंत्यविधी करण्यास गंभीर अडचणी निर्माण होत असल्याने ग्रामस्थांमध्ये संताप उसळला आहे. नेत्रदूत जालिंदर बोरुडे यांनी या प्रश्नावर सातत्याने पाठपुरावा करत जिल्हा परिषद प्रशासनाचे लक्ष वेधले होते. अखेर जिल्हा परिषद प्रशासनाने तातडीने दखल घेऊन १४ लाख रुपयांच्या कामाचे वर्क ऑर्डर काढून कार्यरंभाचे आदेश दिले आहे. ग्रामपंचायतच्या ढिसाळ कारभारामुळे एक महिना उलटूनही काम सुरु करण्यात आलेले नाही. येत्या ७ दिवसात काम सुरू न झाल्यास ग्रामपंचायतीला टाळे ठोकण्याचा इशारा दिला आहे.

स्मशानभूमीतील पत्र्याचा शेड पूर्णतः जीर्ण झाल्याने पावसाळ्यात अंतिम संस्कार करणे अशक्य झाले आहे. अनेकदा अंत्ययात्रेला ग्रामपंचायतसमोरील मंडपात थांबावे लागते आणि पाऊस थांबल्यावरच अंत्यविधीची प्रक्रिया करावी लागत आहे. गेल्या दोन वर्षांपासून हा प्रश्न प्रलंबित आहे. शेडसह स्मशानभूमीत बसण्याची व्यवस्था नाही, रात्री प्रकाश नसल्याने आणखी अडचणी निर्माण होतात. अशा दुःखद प्रसंगी आवश्यक सुविधा उपलब्ध नसल्याने ग्रामस्थांना मोठ्या मनस्तापाला सामोरे जावे लागत आहे.

ग्रामस्थांच्या वतीने बोरुडे यांनी स्मशानभूमीत पत्र्याचे शेड उभारणे, योग्य प्रकाशव्यवस्था करणे, दशक्रियेसाठी ओटे व शेड उभारणे, गेट व परिसरात पेव्हिंग ब्लॉक बसविण्याची मागणी केली होती. मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी व कार्यकारी अभियंता घोरपडे यांनी तांत्रिक मंजूरी देऊन १४ लाख रुपयांच्या कामाचे वर्क ऑर्डर काढले आहे. मात्र, ग्रामपंचायतीने काम श्रेयाच्या राजकारणात अडकवून विलंब केला आहे.

स्मशानभूमीची झालेली दुरावस्था हा ग्रामस्थांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न बनला आहे. बाकीची कामे बाजूला ठेवून हे काम तातडीने मार्गी लावले पाहिजे. पावसाळ्यात अंत्यविधी करणे अशक्य झाले आहे. वर्क ऑर्डर निघूनही काम सुरू न झाल्यास ग्रामपंचायतीला टाळे ठोको आंदोलन करण्याशिवाय पर्याय नाही, असा इशारा जालिंदर बोरुडे यांनी दिला आहे.



कालिका फर्निचर या दुकानाला लागलेल्या आगीत झालेले नुकसान.

# कालिका फर्निचरच्या दुकानाला आग; एकाच कुटुंबातील ५ जणांचा दुर्दैवी मृत्यू

*(पान १ वरुन)*

करून बचावकार्य सुरू करण्याचा प्रयत्न केला; अग्निशमन दलही घटनास्थळी धावले. तथापि, आगीचा वेग इतका जबरदस्त होता की, आत अडकलेल्या कुटुंबाला बाहेर काढणे शक्य झाले नाही.

या घटनेनंतर नेवासा फाटा परिसरात शोककळा पसरली आहे. रासने कुटुंब हे परिसरातील सर्वपरिचित व कष्टाळू म्हणून ओळखले जात होते. दोन निरागस मुलांचा, त्यांच्या आईचा आणि आजीचा असा अकाली अंत झाल्याने स्थानिक नागरिक व्यथित झाले आहेत. ही घटना अत्यंत दुर्दैवी असून, अशा प्रकारची वेळ कोणावरही येऊ नये, अशी प्रतिक्रिया शेजारील दुकानदारांनी दिली.

## नगरमध्ये २८ ऑगस्टला 'निधी आपके निकट' कार्यक्रमाचे आयोजन

नगर - निवृत्तीवेतनधारक आणि कंपनी मालकांसाठी मराठा चेंबर्स ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड ग्रिकल्चर, एमआयडीसी, अहिल्यानगर येथे २८ ऑगस्ट रोजी सकाळी ९.३० वाजता 'निधी आपके निकट' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

निवृत्तीवेतनधारक आणि कंपनी मालकांच्या भविष्यनिर्वाह निधीच्या अडचणी असतील तर आवश्यक त्या कागदपत्रांसह या कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन कर्मचारी भविष्य निधी संघटनेच्या सहायक भविष्य निधी आयुक्तांनी केले आहे.

# सौर कृषी पंप मंजुरीसाठी लाच घेताना 'महावितरण'च्या वायरमनला पकडले

नगर - शेतात मंजूर झालेला सौर कृषी पंप नामंजूर होवू शकतो त्याची मंजुरी कायम ठेवण्यासाठी आणि तो बसवून देण्यासाठी २ हजार ५०० रुपयांची लाच मागून ती स्वीकारताना महावितरणच्या बाह्यस्त्रोत वायरमनला नगरच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडले आहे. राजेंद्र दादासाहेब कराळे (वय ४१, नेमणूक म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित करंजी कक्ष, ता.पाथर्डी) असे या वायरमनचे नाव असून त्याच्यावर पाथर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यातील तक्रारदार यांच्या आईच्या नावे मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेअंतर्गत सौर कृषी पंप मंजूर झाला आहे. त्यानंतर तक्रारदार यांच्या गावाकरिता नेमून दिलेले कराळे वायरमन हे सौर कृषी पंप बसविण्याच्या ठिकाणी तक्रारदार यांचे शेतामध्ये आले व त्यांनी आल्यानंतर जागेची पाहणी केल्यानंतर त्यांच्याकडील मोबाईल मध्ये फोटो काढले व तक्रारदार यांना म्हणाले की, सौर कृषी पंपा चे ठिकाणी लाईटचा पोल आहे त्याकरिता तुमचा सौर कृषी पंप चा अर्ज नामंजूर होऊ शकतो. त्यामुळे सौर कृषी पंप मंजूर करायचा असल्यास ४ हजार रुपये द्या असे म्हणून तक्रारदार यांच्याकडे लाचेची मागणी केली. त्यावेळी कराळे वायरमन हे सौर कृषी पंपाचा अर्ज नामंजूर करण्याची धमकी देत असल्याने तक्रारदार यांनी नाईलाजास्तव त्यांना दोन हजार रुपये दिले होते. त्यानंतर कराळे वायरमन यांनी तक्रारदार यांना उरलेले २ हजार रुपये सौर कृषी पंप बसवल्यानंतर दे असे सांगितले व सर्वे पूर्ण करून शेतातून निघून गेले. त्यानंतर तक्रारदार यांचे शेतामध्ये सौर कृषी पंप बसविण्याचे काम पूर्ण झाले. कराळे वायरमन हे तक्रारदार यांचे शेतात कृषी सौर पंप बसविण्याच्या ठिकाणी सर्वे पूर्ण केल्याच्या मोबदल्यात २ हजार रुपये तसेच तक्रारदार यांचे राहते घराचे वीज मीटरला सिंगल फेजचे कनेक्शन जोडण्यासाठी ५०० रुपये असे एकूण २५०० रुपये लाच मागणी करत असले बाबतची तक्रार ला.प्र.वि. अहिल्यानगर येथे प्राप्त झाली होती. सदर तक्रारीप्रमाणे १७ ऑगस्ट रोजी आरोपी राजेंद्र दादासाहेब कराळे यांचे विरुद्ध लाच मागणी पडताळणी केली असता आरोपी कराळे यांनी तक्रारदार यांचे शेतात कृषी सौर पंप बसविण्याच्या ठिकाणी सर्वे पूर्ण केल्याच्या मोबदल्यात २ हजार रुपये तसेच तक्रारदार यांचे राहते घराचे वीज मीटरला सिंगल फेजचे कनेक्शन जोडण्यासाठी ५०० रुपये असे एकूण २५०० रुपये लाचेची मागणी पंचांच्या समक्ष करून लाच रक्कम स्वतः स्वीकारण्याची तयारी दर्शवली. त्याप्रमाणे १७ ऑगस्ट रोजी सापळा कारवाई दरम्यान आरोपी राजेंद्र कराळे यांनी तक्रारदार यांचे कडून स्वतः २५०० रुपये लाचेची रक्कम स्वीकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे.

ही कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगरचे पोलीस उप अधीक्षक अजित त्रिपुटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राजू आल्हाट, पो. ना. उमेश मोरे, पो. ना. चंद्रकांत काळे, पो. कॉ. गजानन गायकवाड, पो. कॉ. शेखर वाघ, चालक पो. हे. कॉ. हारूण शेख यांच्या पथकाने केली आहे.

यु फोम, बॉन्डेड फोम, हिटलॉन फोम, फोम मॅट्रेसस्, बेड बॅक, सोफा क्लॉथ, फर्निशिंग क्लॉथ, वेलवेट क्लॉथ, सोफा कव्हर्स, सोफा रनर पट्टी, फ्रेमसह नविन सोफा तयार करुन मिळेल
गुलाबचंद कारपेटवाला
खिस्तगल्ली, जुना कापड बाजार मागे, अहमदनगर.
मो. ९४२२३३९४६०,९४२२३३९४४२,९४२२४५४००५

# गृहिणी

## आरोग्य

ज्या व्यक्तींना आपले वजन कमी करायचे आहे अशा व्यक्तींना पपईसोबतच पपईच्या बियांचाही वापर केला जातो. आपण या बियांना सुकवून ठेवू शकतो आणि त्याची पावडर बनवून सुद्धा विविध पदार्थांसोबत त्याचे सेवन करू शकतो. ज्या व्यक्तींना शुगरची समस्या आहे, तसेच पचनासंबंधीची समस्या असेल यावर सुद्धा या बिया अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतात. त्याचबरोबर पपईच्या बिया शरीरामध्ये कॅन्सर पेशींची वाढ होण्यापासून सुद्धा रोखतात. ज्यांना पचनासंबधी किंवा बद्धकोष्ठताची समस्या असेल. त्यांच्यासाठी तर पपईच्या बिया या रामबाण उपाय असतात. तीन ते चार बियांचे सेवन केल्यास तर बद्धकोष्ठतेची समस्या लवकरच दूर होते.

## पाककला

### दूधी भोपळा फ्रायड डाळ

**साहित्य :** १ मध्यम आकाराची लौकी, १/२ वाटी तूर किंवा चणा डाळ, १ सर्व्हिंग स्पून मोहरीचे तेल, हिंग, १टिस्पून मोहरी, जिरे, कढीपत्ता, १ कांदा, ८, ९ लसूण, १ बीटरूट, ३, ४ मिरच्या, १ मोठा टोमॅटो, १/२ टिस्पून हळद, १ टिस्पून धने पावडर, १/३ टिस्पून लाल तिखट, मीठ, १/२ टिस्पून किचन किंग गरम मसाला, दीड ग्लास पाणी

**कृती :** प्रथम एक मध्यम आकाराची लौकी चिरून घ्या आणि अर्धी वाटी तूर किंवा चणा डाळ दहा मिनिटे पाण्यात भिजत ठेवा. नंतर एक कांदा, ८,९ लसूण, एक चौथा बीटरूट, ३, ४ मिरची आणि एक मोठा टोमॅटो यांची पेस्ट बनवा. नंतर कुकर गरम करा आणि एक सर्व्हिंग स्पून मोहरीचे तेल घाला नंतर हिंग, मोहरी, जिरे आणि काही कढीपत्ता घाला. दोन मिनिटांनंतर पिसा कांदा-लसूण पेस्ट घाला. आणि चांगले मिसळा. मसाला चार मिनिटे भाजून नंतर हळद आणि धने पावडर, लाल तिखट घाला आणि भिजवलेली डाळ आणि कौकी घाला. सर्वकाही चांगले मिक्स करा आणि दोन, तीन मिनिटे सोडा. पाच, सात मिनिटे मध्यम/सिम आचेवर शिजल्यानंतर गॅस बंद करा. आता लौकी डाळ भाजी सर्व्ह करण्यासाठी तयार आहे.

## सौंदर्य

गळा, मान येथील त्वचेची स्वच्छता करण्यासाठी हळद + लिंबू रस + दूध यांचे मिश्रण करून भागावर चोळावे. याने त्वचा उजळते.

## सल्ला

डोळ्यांना आराम मिळण्यासाठी कापडी घडी बर्फाच्या पाण्यात बुडवून ही पट्टी डोळ्यावर ठेवावी.

## वास्तू

❊ घरातील वस्तूंचे स्वतःचे योग्य असं स्थान असते. त्या ठिकाणीच त्या असाव्यात. वाटेल तिथे वस्तू ठेवल्यास आपल्या आयुष्यावर त्याचा नकारात्मक परिणाम पडू शकतो. अशामुळे मनःशांती ढळते.

❊ जर घरामधील पलंग दाराजवळ ठेवला असेल तर रात्री शांत झोप लागत नाही. यात्रीची झोपही पूर्ण होत नाही. म्हणून दरवाज्याजवळ पलंग कधीही नसावा.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

मंगळवार, दि. १९ ऑगस्ट २०२५

**अजा एकदशी, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, श्रावण कृष्णपक्ष, आर्द्रा २५।०८, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०५ वा. ३० मि.**

## राशिभविष्य

**मेष** : आजच्या प्रश्नांच्या सोडवणूकीसाठी आपल्या मित्रांचा व आपल्या कौटुंबिक सभासदांचा सहयोग घ्या. मागील जी कामे बाकी आहेत ती पूर्ण करण्यात यश मिळेल.

**वृषभ** : आर्थिक विषयांमध्ये सावधगिरी बाळगा. अधिक खर्च होईल. वाहने व यांत्रिक उपकरणे जपून चालवावीत. कुटुंबियांचा चांगला सहवास लाभेल.

**मिथुन** : आजचा दिवस विधायक कामासाठी चांगला आहे. आपण कुणापासून प्रेरीत व्हाल. पत्नीकडून उत्तम वैवाहिक सुख प्राप्त होईल.

**कर्क** : आजचा दिवस छान जाईल. मैत्रिण किंवा प्रेयसी भेटेल. मनोरंजनासाठी वेळ काढाल. मागील उधारी उसनवारी वसुल होईल.

**सिंह** : योजनाबद्धरीत्याने आपले काम करण्याचा प्रयत्न करा. छोट्या-छोट्या अडचणी येतील. वरिष्ठांची मर्जी संपादन कराल.

**कन्या** : मनोरंजनावर खर्च होईल. शेजारी व कार्यालयीन सहकार्‍यांबरोबर तंटा करू नका. प्रेमसंबंधात यश मिळेल. मनोरंजनाकडे कल राहिल.

**तूळ** : काळजीपूर्वक कार्य करा. पळापळ अधिक राहील. आरोग्याची काळजी घ्या. आज आपणास कामाचा शिण येवू शकतो. हितशत्रुंपासून सावधन असावे.

**वृश्चिक** : संवाद कायम ठेवण्याचा प्रयत्न करा. आपल्या उतावीळ स्वभावावर संयम ठेवून मन शांत ठेवण्याचा प्रयत्न केल्यास यश मिळेल.

**धनु** : आपण अशा लोकांपेक्षा निराळ्या मार्गावर चालण्याची इच्छा ठेवता ज्यावर आपले सहकर्मी आपल्याबरोबर असतील. मात्र अडचणी आपला पिच्छा सोडत नाहीत.


**मकर** : थंड आणि शांत राहाण्याचा प्रयत्न करा. आर्थिक स्थितीमध्ये हळू-हळू सुधारणा येईल. जुन्या मित्रांचा सहवास आनंददायी ठरेल.

**कुंभ** : आपण नव्या ग्राहकांना व प्रख्यात लोकांना भेटाल. शेवटी नव्या योजना आणि प्रकल्प कार्यान्वित करणे आपल्यासाठी श्रेयस्कर ठरेल.


**मीन** : पैसे मिळवण्यासाठी आजचा दिवस उत्तम आहे. आपण इतर लोकांना देखील यासाठी तयार करू शकता.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७२४४ सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७२४३ चे उत्तर



**आडवे शब्द :-** १) महादेवाचे एक नाव ४) आकाशातून जाणारे एक वाहन ६) किराणा दुकानातून आणलेल्या वस्तू ८) मराठी पुरुषाचे एक नाव १०) एक समसंख्या; शास्त्रांची संख्या १२) फिरस्ता; गोसावी १५) अतिरेक्यानी भारतीय विमान अफगाणिस्तानातील या ठिकाणी पळवून नेले होते १६) फळातील रसाळ भाग; मगज १८) उंट हकणारा २०) चालू घडीला; वर्तमान स्थितीत २२) बगीचा; उद्यान; उपवन २३) भास्कर; रवि; सूर्य

**उभे शब्द :-** १) भास्कर; रवि; सूर्य २) यांना हिंदवी स्वराज्य संस्थापक म्हटले जाते ३) जखम वगैरेचा शरीरावर राहणारा डाग ४) 'इन्शुरन्स'चे मराठी रूप ५) मनातील इच्छा; मानसिकता ७) पत्नीचे किंवा पत्नीचे वडील ९) नारायण! नारायण! असा उद्घोष करीत तिन्ही लोकी फिरणारा देवर्षी ११) अवस्था; दशा; गत; वाईट दशा १३) धातूचा दोरा १४) पाण्यात राहणारा एक हिंस्र प्राणी; नक्र १५) गळा; आवाज १७) गव्हाचे कणीदार पीठ १८) गरीब; प्रामाणिक; नीतिमान १९) नखे काढण्याचे न्हाव्याचे हत्यार २०) भडकलेला अग्नी २१) कपट; कट; कारस्थान

# ✱ ✱ ✱ ✱ ✱ ✱ मुलांचे विश्व ✱ ✱ ✱ ✱ ✱ ✱

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : अहंकारापेक्षा नम्रतेचे मोल महान आहे.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### विजेचा शॉक बसल्यास काय होते?

लहान मुले फार उद्योगी असतात. त्यांच्या काहीतरी कारवाया चालू असतात. विजेच्या उपकरणांशी खेळणे तर मुलांना फारच आवडते. इकडचा बल्ब काढून दुसरीकडे लाव, असली काही कामे करायला मुले नेहमीच तयार असतात. कधी कधी मात्र या गोष्टी अंगलट येतात. जुनाट वायरवर ओले कपडे वाळत घालणे, प्लगमध्ये खिळा घालणे, बल्ब होल्डरमध्ये बोट घालणे इत्यादीमुळे विजेचा शॉक बसतो. विजेचा शॉक बसला नाही, असा माणूस सापडणे अवघडच आहे. पाणी तापवण्यासाठी बऱ्याच घरात वापरल्या जाणाऱ्या इमर्शन रॉडचे बटण चालू असताना पाण्यात हात घातला तरी शॉक बसतो.

विजेचा शॉक हा तसा आपल्याला बारीकसा वा दोन मिनिटे झिणमिण्या आणणारा अपघात वाटला, तरी प्रत्यक्षात मात्र तो जीवघेणा असा गंभीर अपघात ठरू शकतो. आकाशात चमकणारी वीज कोणाच्या अंगावर पडली, तर ती व्यक्ती वाचत नाही. तिचा जळून अगदी कोळसा होऊन जातो. घरगुती विजेमुळे मात्र कमी-अधिक शक्तीचे धक्के बसू शकतात. डीसी वीज ही एसीपेक्षा जास्त घातक असते. महाराष्ट्रात जवळपास सगळीकडची वीज एसी आहे. आकाशातून पडणारी वीज मात्र डीसीप्रमाणे कार्य करते.

विद्युत धक्क्याचे व शॉकचे दोन प्रकारे परिणाम होतात. एक म्हणजे भाजणे व दुसरे म्हणजे मज्जासंस्था, स्नायू व हृदय यांच्यावर विद्युतप्रवाहाचा परिणाम होणे. विद्युतधक्क्यामुळे हृदयाची गती अनियमित होण्याची किंवा हृदय बंद पडण्याची शक्यता असते.

शॉकमुळे स्नायू अचानक आकुंचन पावतात व त्यामुळे दूर फेकले जाणे, खाली पडणे अशा मोठ्या हालचाली होऊ शकतात. विजेचा शॉक खूप मोठा असेल, तर बेशुद्धी येते किंवा मृत्यूही ओढवतो. वीज आणि विकास यांची सांगड आहे, हे आपण औद्योगिक क्रांतीपासून अनुभवतोय. पण वीज आणि विनाश यांच्या परस्परसंबंधाची जाणीव आपल्याला अपघातातून अधूनमधून होत असते. वीज हे दुधारी शस्त्र आहे. त्यामुळे त्याचा वापर करताना नीट काळजी घेणे अगत्याचे आहे, अन्यथा जीवावर बेतू शकते.

### धोकेबाज


एकदा एका जंगलात, नदीच्या काठावर असलेल्या जांभळाच्या झाडावर एक माकड राहत होते. त्याच जंगलात एक मगर आणि त्याची बायको राहत होती. एके दिवशी मगर नदीच्या काठावर येऊन झाडाखाली विसावला. दयाळू माकडाने त्याला काही जांभळे दिली. मगर दुसऱ्या दिवशी आणखी जांभळांसाठी परत आला, कारण त्याला जांभळे आवडत होती. जसजसे दिवस जाऊ लागले तसतसे मगर आणि माकड चांगले मित्र बनले.

एके दिवशी माकडाने मगरीच्या पत्नीसाठी काही फळे पाठवली. तिने जांभळे खाल्ली आणि तिला ती आवडली. पण तिला मत्सर वाटत होता, कारण तिला तिच्या नवऱ्याने माकडासोबत वेळ घालवणे आवडलेले नव्हते. तिने आपल्या पतीला सांगितले, जर फळे इतकी रसाळ असतील तर माकडाचे हृदय किती गोड असेल. मला माकडाचे हृदय मिळवून दे. मगरीला आपल्या मित्राला मारायचे नव्हते, पण पर्याय नव्हता.

त्याने माकडाला त्याच्या घरी जेवायला बोलावले आणि त्याच्या पत्नीला त्याला भेटायचे आहे असे सांगितले. माकड आनंदी होते. पण पोहता येत नव्हते म्हणून मगरीने त्याला पाठीवर घेतले. आपण माकडाला फसवल्याचा आनंद मगरीला झाला, मात्र, बोलताना त्याने माकडाला घरी नेण्याचे खरे कारण सांगून टाकले. हुशार माकड म्हणाले, तुम्ही मला आधी सांगायला हवे होते, मी माझे हृदय झाडावरच ठेवले आहे. आपण परत जाऊन ते घेऊन आले पाहिजे. मगरीने त्याच्यावर विश्वास ठेवला आणि माकडाला पुन्हा झाडाकडे नेले. त्यामुळे हुशार माकडाचा जीव वाचला.

तात्पर्य : मित्रमैत्रिणी निवडताना काळजी घ्या आणि प्रसंगावधान राखा.

## जीवन का अमृत (भाग १)



सोई हुई है। हमने एक नया रूप अख्तियार कर लिया है, जो हमारे असली रूप से कहीं अलग है। गुरु साहब यही फ़रमा रहे हैं कि हमारी बुद्धि भी भ्रष्ट हो गई है । हममें सही-ग़लत में फ़र्क करने की अक्ल नहीं रही कि सत्य क्या है, असत्य क्या है ? जो परा-विद्या का ज्ञान हमें होना चाहिए, वह हमारे पास नहीं है और हम अपरा-विद्या के ज्ञान के अहंकार में ही मस्त हैं । उससे क्या हुआ है ? हमारी आत्मिक बुद्धि का नाश हो गया है । हमने आत्मिक ज्ञान को पाना था, लेकिन हम बाहरी ज्ञान में ही अटके रह गए । हमारा ध्यान शरीर तक ही सीमित है । हमारी बुद्धि बेकार है ।

### गुरू और परमात्मा

हममें आत्मिक बल था । यहाँ वे शारीरिक बल की बात नहीं कर रहे हैं । वे उस नूर की बात कर रहे हैं, जो हम सबमें है; वह नूर जिससे सारी सृष्टि रची गई, वह शब्द जिसके आधार पर सृष्टि चलती है, जो हमारी रग-रग में समाया हुआ है; वह रोशनी जो अंतर के मंडलों में हमें रास्ता दिखाती है । हमारी आत्मा प्रभु की अंश है, चेतन है, प्रभु के प्यार से भरपूर है, प्रभु के नूर से भरपूर है, और उसी नूर से उसे बल मिलता है, जिसे संत दर्शनसिंह जी महाराज ने 'Soulergy' के नाम से पुकारा है । जैसे इस सूर्य की ऊर्जा होती है, वैसे ही आत्मा की भी उर्जा है, जो सूर्य की उर्जा से कई गुणा ज्यादा प्रकाशमान है । इसी आत्मिक उर्जा को हम खो बैठे हैं क्योंकि उसके अस्तित्व के बारे में हमें मालूम नहीं है और उसे प्राप्त करने के लिए हम प्रयास भी नहीं करते । अगर कुएं में भाँग मिला दी जाए, तो जो भी उसका पानी पीयेगा, वह मस्ती में झूमने लगेगा । हमारी हालत भी कुछ ऐसी ही है । हम इस धरती पर आये हैं । यह धरती जो illusionary world है, जो माया की दुनिया है,

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

रासायनिक खाद के गलत प्रयोग के कारण जमीन में से कई सारे जीवाणु मारे जाते हैं, जिससे प्रकृति को दुःख मिलता है, कुदरती नियमों में बाधा आती है और कीटनाशक छिड़कने से कीट तड़फ-तड़फकर मरते हैं । इसी तरह कीटकों को विष पिलाकर मारना यह भी तो पाप कर्म ही है । वास्तव में कोई भी प्रकार के कीट को मारना या नष्ट करना, यह हम मनुष्य आत्माओं का काम नहीं है, परन्तु उस कीट को नष्ट करने की जिम्मेदारी कुदरतने बनाकर रखी है अर्थात् कई और कीट हैं जो उस पर उपजीविका चला सके । कर्मों की गुह्य गति पर विचार करने से यह पता चलता है कि हमारे जीवन में जो भी समस्यायें या परिस्थितियाँ आती हैं, उनके पीछे एक ही कारण है और वह कारण है हमारे ही किये हुए बुरे कर्म । अगर कोई बीमारी आती है तो यह भी हिसाब-किताब है अर्थात् प्रकृति के नियमों में हमने रुकावट डाली है, प्रकृति को दुःख दिया है । महाभारत में एक आख्यान है कि जब भीष्मपितामह जख्मी होकर शरशैय्या पर लेटे थे, तब उन्होंने श्रीकृष्ण जी को पूछा कि मैंने ऐसा कौन-सा विकर्म किया जो मुझे बाणों की शैय्या पर लेटे शरीर छोड़ना पड़ रहा है ? तब श्रीकृष्ण जी ने भीष्म जी को बताया कि एक बार भीष्म जी रथ में बैठकर गुजर रहे थे तब उनके सामने एक साँप आया जो रथ के नीचे आने से मरने वाला था। उस साँप को मरने से बचाने के लिए भीष्मपितामह जी ने साँप को उठाकर बाजू में फेंक दिया और भीष्म जी चले गये । उस समय वह साँप काँटों की झाड़ी पर जा गिरा इसलिए साँप हिल नहीं पाया, चल न सका और वह वहाँ ही मर गया । परिणामस्वरूप भीष्म जी को भी अन्तिम समय पर इसी तरह शरीर छोड़ना पड़ा । इस आख्यान को देखते हुए कर्मों की गुह्य गति यह समझाती है कि वर्तमान समय बहुत सारे लोग कहते हैं कि हमने अपने जीवन में इतना अच्छा कार्य किया, इतना-इतना कमाया, हमने आज तक कोई भी बुरा कर्म नहीं किया, किसी को भी दुःख नहीं दिया । लेकिन ऐसे व्यक्तियों के जीवन में भी ऐसी कुछ परिस्थिति आती है जो वो लोग भी दुःख, अशान्ति, तनाव महसूस करने लगते हैं । तो इसका कारण भी यही है कि उन्होंने कोई ऐसे कर्म किये हैं, जिसका यह फल है । चाहे कोई भी बीमारी हो या समस्या हो, उसके लिये किसी दूसरे को दोषी ठहराने की बात ही नहीं उठती है । इसलिए वर्तमान समय जो भी कर्म हम कर रहे हैं उससे प्रकृति सहित सर्व को, जरा भी जाने अन्जाने में भी किसी को दुःख न हो इस पर ध्यान देना बहुत आवश्यक है । कुदरती नियमों को थोड़ा भी डिस्टर्ब करना मनुष्य के अधिकार में नहीं है फिर भी अगर करेंगे तो हिसाब तो देना ही पड़ेगा ।

### आज्ञा चक्र

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

वडील (मुलाला) : तू मघापासून कोंबडा का झाला आहेस?
मुलगा : बाबा, तुम्हीच तर म्हणाला होतात ना
की जे काम शाळेत करशील तेच घरातही अर्धा तास करत जा म्हणून!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

❊ अमेरिकेचे ४७ वे राष्ट्रपती कोण आहेत?

– डोनाल्ड ट्रम्प

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदीय बालसंस्कार

**शरीरदोष अवस्था :** पिंडी ते ब्रह्मांडी ही उक्ती आयुर्वेदामध्ये सांगितली आहे. निसर्गाचे चक्र ज्याप्रमाणे सुरू असते, त्याचप्रमाणे आपल्या शरीराचे देखील सुरू असते. ग्रीष्म ऋतूत रखरखीत, प्रखर उन्हामुळे पृथ्वीवर पाण्याचे प्रमाण कमी होऊन सर्व ठिकाणी रूक्षता निर्माण होते. याच पद्धतीने शरीरामध्ये सर्व अवयवांत रूक्षता निर्माण होते. या रूक्षतेमुळेच शरीरामध्ये वातदोषाचे अधिक्य निर्माण होते. बाह्य वातावरणाचा परिणाम शरीरावर लगेचच होतो. कडक उन्हामुळे शरीराला घाम फार येतो. घामावाटे शरीरातील उष्मा बाहेर पडतो. त्यामुळे शरीरातील अग्निशक्ती खर्ची पडते आणि शरीरात अग्निमांद्य निर्माण होते. म्हणजेच पचनशक्ती कमी होते.

**आहार :** या ग्रीष्म ऋतूत मधुर (गोड), आम्ल (आंबट), लवण (खारट) या रसांचे पदार्थ जास्त प्रमाणात आहारामध्ये घ्यावेत. याउलट तिक्त (कडू), कटु (तिखट), कषाय (तुरट) या रसाचे पदार्थ अगदी कमी प्रमाणात घ्यावेत. कारण या रसांमुळे वातदोषाचे अधिक्य वाढते. म्हणून हरभरा, तूर, मटकी, कुळीथ अशा प्रकारची कडधान्ये व त्यापासून बनविलेल्या डाळी आहारात घेऊ नयेत. मुगाचा वापर थोड्याफार प्रमाणात करू शकतो. आहारामध्ये पोळी, भाकरी, भात, तसेच पालेभाज्यांचे प्रमाण भरपूर असावे. भोपळा, दोडका, घोसाळे, भेंडी, लाल भोपळा यांसारख्या फळभाज्या, तसेच पालक, राजगीरा, तांदुळजा, चुका, माठ यांसारख्या पालेभाज्या आहारामध्ये घ्याव्यात. गाजर, काकडी, टोमॅटो, बीट, कांदा यांचे सॅलड जेवणामध्ये आवर्जून घ्यावे. उष्णतेचा त्रास होऊ नये म्हणून या ऋतूमध्ये कच्चा कांदा खाणे जास्त हितकारक आहे. कारण कांदा उष्णतेपासून होणाऱ्या सर्व विकारांपासून शरीराचा बचाव करतो. बाजरीची भाकरी अजिबात खाऊ नये, कारण ती उष्ण व रूक्ष गुणाची असते. त्यामुळे शरीरात वातसंचय होऊन वातप्रकोप होऊ शकतो. बटाटा, रताळी, सुरण ही कंदमुळे मधुर रसाची असल्याने आहारामध्ये भरपूर खावीत. या ऋतूमधील सर्व फळे खावीत. कलिंगड, खरबूज, कैरी, करवंदे, जांभूळ, द्राक्षे, केळी, डाळिंब, अंजीर, पेरू, आंबा अशी सर्व मधुर व आंबट रसाची फळे खावीत. या ऋतूमध्ये फळे उपलब्ध असणे हे निसर्गाने सर्वांसाठी दिलेले वरदानच आहे. त्यांचा आरोग्य राखण्यासाठी आहारामध्ये भरपूर वापर करावा. या फळांमुळे अशक्तपणा, थकवा व उष्णतेचे विकार कमी होतात. ग्रीष्म ऋतूत उष्णतेमुळे शरीरातील स्निग्धता कमी होते. म्हणून या ऋतूत भरपूर द्रवपदार्थ पिणे गरजेचे आहे. लिंबू सरबत, आवळा सरबत, कोकम सरबत, कैरीचे पन्हे, फळांचा रस, नारळाचे पाणी पिणे या ऋतूत लाभदायक ठरते. फक्त सरबत करताना साखरेऐवजी नैसर्गिक गुळाचा वापर करावा. तसेच नाचणीची खीर, तांदळाची खीर, शेवयाची खीर, रव्याची खीर अशा विविध खिरी ड्रायफुट्स टाकून खाव्यात. फक्त आहार घेताना तो भरपेट न घेता कमी प्रमाणात व हलका घ्यावा. कारण या ऋतूमध्ये पचनशक्ती कमी झालेली असते. **(क्रमशः)**

### आयुर्वेदीय आहार दृष्टीकोन

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००



हिंद सेवा मंडळाच्या भाई सथ्था नाईट हायस्कूलने राज्यातील सर्व रात्रशाळांमध्ये प्रथम क्रमांक पटकाविल्याबद्दल मासूम संस्थेच्या वतीने संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना व शिक्षकांना सन्मानित करण्यात आले.

# भाई सथ्था नाईट हायस्कूलचे राज्यात अव्वल स्थान

## १० वी बोर्ड परीक्षेत सर्वाधिक शाळाबाह्य विद्यार्थ्यांना प्रवेशित केल्याबद्दल मासूम संस्थेकडून गौरव

नगर – हिंद सेवा मंडळाच्या भाई सथ्था नाईट हायस्कूलने पुन्हा एकदा इतिहास रचला आहे. या शाळेने राज्यातील सर्वाधिक विद्यार्थी १०वी बोर्ड परीक्षेसाठी प्रवेशित केले असून, त्यापैकी ४ विद्यार्थी राज्याच्या गुणवत्ता यादीत झळकले. या कामगिरीमुळे राज्यातील सर्व रात्रशाळांमध्ये भाई सथ्था नाईट हायस्कूलने प्रथम क्रमांक पटकाविला आहे. मुंबई येथील मासूम संस्थेच्या वतीने राज्यातील सर्व भाषिक रात्रशाळांचे परीक्षण करण्यात आले. या परीक्षणात भाई सथ्था नाईट हायस्कूलला राज्यात अव्वल ठरवून सन्मानित करण्यात आले.

या यशानंतर शाळेचे प्राचार्य सुनिल सुसरे, शिक्षकवर्ग तसेच राज्याच्या गुणवत्ता यादीत चमकलेले विद्यार्थी दीक्षा रमेश गवळी (प्रथम क्रमांक, समाजशास्त्र विषयात १०० पैकी ९५ गुण), मंदा भाऊसाहेब भोराडे (पाचवा क्रमांक), इशिता विक्रम भोर (आठवा क्रमांक), जयश्री जगन्नाथ वैरागर यांचा हिंद सेवा मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला. विशेष म्हणजे, दीक्षा गवळीने समाज अभ्यास विषयात राज्यात प्रथम क्रमांक पटकाविल्याबद्दल त्यांचे विषय शिक्षक गजेंद्र गाडगीळ यांचाही विशेष सन्मान झाला.

सन्मान सोहळा अजित बोरा यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी संस्थेच्या उपाध्यक्षा संगीता ॲबट, पेमराज सारडा कॉलेजचे चेअरमन डॉ. पारस कोठारी, शाळेच्या चेअरपर्सन प्रा. ज्योतीताई कुलकर्णी, शालेय समिती सदस्य विलास बडवे, सहाय्यक सचिव बी.यू. कुलकर्णी, प्राचार्य सुनिल सुसरे आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमप्रसंगी मंदा भोराडे या विद्यार्थिनीने आपले मनोगत व्यक्त केले मनोगतात २७ वर्षानंतर पुन्हा प्रवेशीत होऊन मिळविलेल्या यशाबद्दल समाधान व्यक्त केले.

सूत्रसंचालन महादेव राऊत यांनी केले. बाळू गोरडे यांनी आभार मानले. या कार्यक्रमासाठी नाईट हायस्कूलचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष प्रा. शिरीष मोडक, कार्याध्यक्ष डॉ. रमेश झरकर, मानद सचिव संजय जोशी, ज्येष्ठ मार्गदर्शक ब्रिजलाल सारडा, माजी कार्याध्यक्ष अनंत फडणीस आणि मासुम संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी निकिता केतकर यांनी अभिनंदन केले.

# भारतीय जनता पार्टी अहिल्यानगर शहर जिल्ह्याची कार्यकारिणी जाहीर

नगर – भारतीय जनता पक्षाच्या अहिल्यानगर शहर जिल्ह्याची नूतन कार्यकारिणी शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांनी रविवारी जाहीर केली. प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, प्रदेश महामंत्री विजय चौधरी व विभाग संघटन मंत्री रवी अनासपुरे यांच्या मान्यतेने घोषणा करण्यात आली. कार्यकारिणीमध्ये ९ उपाध्यक्ष, ४ सरचिटणीस, ७ चिटणीस, प्रसिद्धी प्रमुख, कार्यालयीन प्रमुख, कोषाध्यक्ष ६१ कार्यकारणी सदस्य, मोर्चा, आघाड्या, प्रकोष्ठ व सेल प्रमुख तसेच विशेष निमंत्रित व विशेष आमंत्रितांच्या नावांची घोषणा करण्यात आली आहे.

कार्यकारिणी पुढीलप्रमाणे – अध्यक्ष अनिल मोहिते, उपाध्यक्ष दीप्ती गांधी, माजी उपमहापौर मालन ढोणे, बाबासाहेब सानप, बाळासाहेब भुजबळ, ज्ञानेश्वर काळे, उदय अनभुले, नितीन शेलार, साहेबराव विधाते व गोपाल वर्मा. सरचिटणीस निखिल वारे, अशोकराव गायकवाड, महेश नामदे, ज्योती दांडगे. चिटणीस मिलिंद भालसिंग, करण ढापसे, स्वप्निल दगडे, पियुष जग्गी, चंद्रकांत पाटोळे, विजय गायकवाड व राहुल मुथा. कोषाध्यक्ष रामदास आंधळे, कार्यालयीन मंत्री मुकुल गंधे, अनुसूचित मोर्चा अध्यक्ष संजय गायकवाड, युवा मोर्चा अध्यक्ष रुद्रेश अंबाडे, ओबीसी मोर्चा अध्यक्ष गणेश विद्दे, आदिवासी मोर्चा अध्यक्ष वैभव सुरवसे, प्रसिद्धी प्रमुख शशांक कुलकर्णी, संवादक अविनाश वाणी, कामगार आघाडी प्रकोष्ट प्रमुख महादेव गाडे, उद्योग आघाडी प्रमुख निनाद टिपूगडे, व्यापारी आघाडी प्रमुख महेश गुगळे, वैद्यकीय सेल प्रमुख डॉ.धैर्यशील केवळ, कायदा सेल प्रमुख ॲड.चंदन बारटक्के, ट्रान्सपोर्ट सेल प्रमुख प्रियंका चौधरी, सोशल मीडिया प्रमुख सार्थक आगरकर, शिक्षक सेल प्रमुख वैभव सांगळे, अध्यात्मिक समन्वय प्रकोष्ट प्रमुख मयूर जोशी, पदवीधर प्रकोष्ट प्रमुख दामोदर बठेजा, क्रीडा प्रकोष्ट प्रमुख आदित्य धोपावकर, जैन प्रोकोष्ठ प्रमुख रवींद्र बाकलीवाल, सांस्कृतिक सेल प्रमुख पुष्कर तांबोळी, आयटीसी प्रमुख रोहित तोलानी, आयुष्यमान भारत सेल प्रमुख राजू वाडेकर.

याशिवाय विशेष निमंत्रित पालकमंत्री राधाकृष्ण विखे, विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, डॉ.सुजय विखे, बाबासाहेब वाकळे तसेच विशेष अमंत्रित अभय आगरकर, सुनील रामदासी, सदाशिव देवगावकर, वसंत लोढा, सुवेंद्र गांधी, मिलिंद गंधे, किशोर वाकळे, रवींद्र बारस्कर, आशा कराळे, मनोज दुलम, सोनाबाई शिंदे, मनोज कोतकर, पल्लवी जाधव, बाळासाहेब गायकवाड, अनिल गट्टानी, नरेंद्र कुलकर्णी, लता शेळके, राहुल कांबळे, गौरी नन्नावरे, गीता गिल्डा, दामोदर बठेजा, वंदना ताठे व सुरेखा विद्ये याशिवाय ६१ जिल्हा कार्यकारणी सदस्य सदस्यांच्या नावांची घोषणा करण्यात आली आहे.

# गुरु तेग बहादुर शहिदी व गुरु गोबिंदसिंग गुरुतागद्दीच्या ३५० व्या शताब्दीनिमित्त पंजाब येथून आलेल्या जथाचे स्वागत

## नगर-कीर्तन उत्साहात, ढोल-ताशांच्या निनादात, जो बोले सो निहाल, सत श्री अकाल! च्या जयघोषाने दुमदुमले शहर

नगर – गुरु तेग बहादुरजी यांची शहिदी आणि श्री गुरु गोबिंदसिंग यांच्या गुरुतागद्दीच्या ३५० व्या शताब्दी वर्षानिमित्त शहरात आलेल्या नगर–कीर्तनाचे उत्साहात स्वागत करण्यात आले. गुरुद्वारा भाई दया सिंगजी, गोविंदपुरा व समूह नानक नाम लेवा संगत अहिल्यानगर यांच्या वतीने या जथाचे स्वागत करुन डिएसपी चौकातून गुरुद्वारा गोविंदपुरा पर्यंत नगर–कीर्तनाची रॅली काढण्यात आली.

ढोल पथकाच्या निनादात आणि जो बोले सो निहाल, सत श्री अकाल! या जयघोषांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. नगर–कीर्तनात गुरुग्रंथ साहेबांसह शीख गुरू व साहेबजाद्यांच्या शस्त्रांचा समावेश असलेला भव्य रथ होता. मिरवणुकीच्या अग्रभागी पंचप्यारे चालत होते. फुलांच्या वर्षावात पार पडलेल्या या सोहळ्यात शीख, पंजाबी व सिंधी समाज बांधवांनी उत्साहाने सहभाग घेतला.





गुरु तेग बहादुरजी यांची शहिदी आणि श्री गुरु गोबिंदसिंग यांच्या गुरुतागद्दीच्या ३५० व्या शताब्दी वर्षानिमित्त शहरात आलेल्या नगर–कीर्तनाचे उत्साहात स्वागत करण्यात आले. गुरुद्वारा भाई दया सिंगजी, गोविंदपुरा व समूह नानक नाम लेवा संगत अहिल्यानगर यांच्या वतीने या जथाचे स्वागत करुन डिएसपी चौकातून गुरुद्वारा गोविंदपुरा पर्यंत नगर–कीर्तनाची रॅली काढण्यात आली.

या नगर–कीर्तनात मुखी शिरोमणी पंथ अकाली बुढ्ढा दलचे (पंजवा तख्त) प्रमुख बाबा बलबीरसिंग ९६ करोडी, बाबा कन्हैय्याजी, बाबा रणजीतसिंह (मनमाड), जयमलसिंह थिल्लो (नांदेड) व सुखदेवसिंह (दमदमा साहेब) यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांच्या दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली. गुरुद्वारा भाई दया सिंगजी येथे अध्यक्ष बलदेवसिंग वाही यांनी नगर–कीर्तनाचे स्वागत केले. यावेळी खासदार निलेश लंके, आमदार संग्राम जगताप, संभाजी कदम, ब्रिगेडियर चावला, अजिंक्य बोरकर, योगीराज गाडे यांनी भेट देऊन दर्शन घेतले.

गुरुद्वारा येथे गुरु हरगोविंद साहेबांची कटार, श्री गुरु गोबिंदसिंगजी यांची तलवार (कृपान), बाबा फतेहसिंह यांची ढाल व बाबा दीपसिंहजींची दुमाला (पगडी) चक्राचे भाविकांना दर्शन घडविण्यात आले. भक्तांनी मनोभावे या ऐतिहासिक शस्त्रांचे दर्शन घेतले. बाबा बलबीरसिंग ९६ करोडी व बाबा कन्हैय्याजी यांनी गुरुद्वाऱ्यात भाविकांशी संवाद साधत ऐतिहासिक घटनांना उजाळा दिला.

दमदमा साहेब, पंजाब येथून निघालेल्या या नगर–कीर्तनाच्या माध्यमातून गुरुसाहेबांचे शस्त्र देशभरातील भाविकांना दर्शनासाठी उपलब्ध करून दिले जात आहेत. यामुळे शीख समाजाचा इतिहास व त्यांनी धर्मासाठी दिलेले बलिदानाच्या घटनांना उजाळा दिला जात आहे. नुकतेच हे नगर–कीर्तन पुणे येथून अहिल्यानगरमध्ये दाखल झाले होते. संध्याकाळी ते छत्रपती संभाजीनगरकडे मार्गस्थ झाले. नगर–कीर्तन यात्रेला सहकार्य केल्याबद्दल पोलीस व जिल्हा प्रशासनाचे आभार मानण्यात आले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गुरुद्वारा भाई दया सिंगजी येथील सर्व सेवादारांनी अध्यक्ष बलदेवसिंग वाही यांच्या मार्गदर्शनाखाली परिश्रम घेतले. कार्यक्रमाची सांगता गुरुद्वाऱ्यातील लंगराने झाली.



स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने १५ ऑगस्ट रोजी रोटरी क्लब राहुरी सेंट्रलच्या वतीने जिल्हा परिषद शाळा, आडभाई वस्ती, कनगर येथे शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना दप्तराचे वाटप करण्यात आले.

# रोटरी क्लब राहुरी सेंट्रलच्यावतीने विद्यार्थ्यांना दप्तर वाटप

नगर – ७९ व्या स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने १५ ऑगस्ट रोजी रोटरी क्लब राहुरी सेंट्रल च्या वतीने जिल्हा परिषद शाळा, आडभाई वस्ती, कनगर येथे शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना दप्तराचे वाटप करण्यात आले. या प्रसंगी ध्वजारोहणाचा मान रोटरी क्लबचे अध्यक्ष अविनाश साबरे, सचिव डॉ. जयंत कुलकर्णी यांना देण्यात आला. विविध क्षेत्रात प्राविण्य मिळालेल्या विद्यार्थ्यांना क्लबचे संचालक विष्णुपंत औटी यांच्या हस्ते पारितोषिक प्रदान करण्यात आले.

यावेळेस बोलताना सचिव डॉ. जयंत कुलकर्णी यांनी दर महिन्यातून एकदा या शाळेला भेट देऊन शाळेच्या काही अडचणी रोटरी क्लबच्या मार्फत समजून घेण्यात येतील व त्यावेळेस योग्य ती मदत करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

ग्रामपंचायत सदस्य भाऊसाहेब आडभाई यांनी रोटरी क्लबच्या उपक्रमाबद्दल आभार व्यक्त केले. विद्यार्थ्यांचे विविध गुण प्रदर्शन पार पडले. ग्रामस्थ, विद्यार्थी व शिक्षक वृंद उपस्थित होते. प्रास्ताविक मुख्याध्यापिका सौ. सुषमा रायते यांनी केले. संजय आडभाई यांनी आभार मानले. कार्यक्रमानंतर सर्वांनी स्नेहभोजनाचा आस्वाद घेतला.

# नगर-कीर्तनाचे तारकपूर येथील गुरुद्वाराकडून उत्साहात स्वागत

## बाबाजींच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी

नगर – तारकपूर येथील भाई कुंदनलालजी गुरुद्वारा, अमृतवेला–बाबा सिरचंद महाराज गुरुद्वारा, गुरु अर्जुन सामाजिक प्रतिष्ठान व जनक आहुजा परिवाराच्या वतीने गुरु तेग बहादुरजींच्या शहिदी आणि श्री गुरु गोबिंदसिंग यांच्या गुरुतागद्दीच्या ३५० व्या शताब्दी वर्षानिमित्त शहरात दाखल झालेल्या नगर–कीर्तनाचे टॉप अप पेट्रोल पंप येथे उत्साहात स्वागत करण्यात आले.



तारकपूर येथे शहरात दाखल झालेल्या नगर–कीर्तनाचे उत्साहात स्वागत करण्यात आले.

पारंपरिक पंजाबी ढोलच्या निनादात व फुलांच्या वर्षावात नगर–कीर्तनाचे स्वागत करण्यात आले. या सोहळ्याने संपूर्ण परिसरात धार्मिक उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. नगर–कीर्तनातील मुखी शिरोमणी पंथ अकाली बुढ्ढा दल (पंजवा तख्त) प्रमुख बाबा बलबीरसिंग ९६ करोडी, बाबा कन्हैय्याजी, बाबा रणजीतसिंह (मनमाड), जयमलसिंह थिल्लो (नांदेड), सुखदेवसिंह (दमदमा साहेब) आणि पंचप्यारे यांचे स्वागत जनक आहुजा यांनी केले. यावेळी हरजीतसिंग वधवा, जगजीतसिंग (जितू) गंभीर, प्रितपालसिंग धुप्पड, राजेंद्र कंत्रोड, सतीश गंभीर, अनीश आहुजा, चिंटू गंभीर, टिटू चोप्रा, अमित थापर, कैलाश नवलानी, राजा नारंग, सिमर वधवा, राजू जग्गी, सनी वधवा, नारायण अरोरा, कवलजितसिंग गंभीर, राजवंश धुप्पड, कन्हैय्या बालानी, सिमरजितसिंह वधवा, अमिता कंत्रोड आदींसह शीख, पंजाबी व सिंधी समाज बांधव उपस्थित होते.

नगर – कीर्तनात बाबाजींच्या दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती. यावेळी बाबा बलबीरसिंग ९६ करोडी यांनी भाविकांशी संवाद साधून पवित्र अरदास केली.

जनक आहुजा यांनी सांगितले की, संत–महात्म्यांच्या आगमनाने व नगर–कीर्तनाने शहराची भूमी पावन झाली आहे. त्यामुळे सर्व समाजबांधवांमध्ये उत्साहाचे वातावरण असल्याचे त्यांनी सांगितले.

नगर–कीर्तनात गुरु हरगोविंद साहेबांची कटार, श्री गुरु गोबिंदसिंगजींची तलवार (कृपान), बाबा फतेहसिंह यांची ढाल, तसेच बाबा दीपसिंहजींची दुमाला (पगडी) चक्राचा समावेश होता. भाविकांनी या शस्त्रांचे मनोभावे दर्शन घेतले.

दमदमा साहेब, पंजाब येथून निघालेल्या या नगर–कीर्तनाच्या माध्यमातून गुरुसाहेबांचा इतिहास व शौर्य भाविकांपर्यंत पोहोचविण्यात येत आहे. पुणे येथून आलेले हे नगर–कीर्तन अहिल्यानगरमध्ये दर्शनासाठी थांबल्यानंतर संध्याकाळी टॉप अप पेट्रोल पंप परिसरातून छत्रपती संभाजीनगरकडे मार्गस्थ झाले.

# शहरातील राधाकृष्ण मंदिरात चिमुकल्यांनी फोडली दहीहंडी; राधा-कृष्ण रासलीलेच्या जीवंत देखाव्याने भाविक मंत्रमुग्ध

### श्रीकृष्ण जन्मोत्सव भक्तीभावाने साजरा

नगर – शहराच्या सर्जेपुरा येथील पंजाबी सनातन धर्मसभेचे राधाकृष्ण मंदिरात (ट्रस्ट) श्रीकृष्ण जन्माष्टमीचा सोहळा विविध धार्मिक कार्यक्रमांनी उत्साहात पार पडला. १५ ऑगस्ट रोजी मध्यरात्री १२ वाजता मंदिरात श्रीकृष्ण जन्मोत्सव भक्तीभावाने साजरा करण्यात आला. तर शनिवारी दुपारी श्रीकृष्णच्या वेशभूषेत आलेल्या बालगोपालांनी दहीहंडी फोडून गोपाळकाला साजरा केला. हदीहंडी फुटताच हाथी घोडा पालखी.. जय कन्हैया लाल की! च्या जयघोषाने मंदिर परिसर दणाणून निघाला. राधा व श्रीकृष्णच्या वेशभुषेत अवतरलेल्या चिमुकल्या मुला–मुलींनी सर्वांचे लक्ष वेधले.



शहराच्या सर्जेपुरा येथील पंजाबी सनातन धर्मसभेचे राधाकृष्ण मंदिरात (ट्रस्ट) श्रीकृष्ण जन्माष्टमीचा सोहळा विविध धार्मिक कार्यक्रमांनी उत्साहात पार पडला.

शुक्रवारी रात्री झालेल्या कार्यक्रमात बबलू दुग्गल व त्यांच्या सहकलाकारांनी राधा–कृष्णवर एकाहून एक सरस भक्तीगीते सादर केली. भक्तीगीतांनी बहरलेल्या कार्यक्रमाचा भाविकांनी मनमुराद आनंद लुटला. यावेळी कृष्ण लीलाचे सादरीकरण करण्यात आले. कृष्ण व सुदामा भेट व राधा–कृष्ण रासलीलेचा जीवंत देखाव्याने भाविक मंत्रमग्ध झाले. याप्रसंगी शीख, पंजाबी समाज बांधवांसह महिला उपस्थित होत्या. राधा–कृष्णच्या वेशभुषेत अवतरलेल्या युवतींनी सर्वांचे लक्ष वेधले व विविध भक्तीगीतांवर नृत्याचे सादरीकरण केले. राधा–कृष्णवर भक्तीगीतांनी बहरलेल्या कार्यक्रमात भाविकांनी देखील ठेका धरला होता. भजनाने वातावरण भक्तीमय बनले होते. गोविंद बोलो, हरि गोपाळ बोलो... भजन सादर करुन रात्री १२ वाजता मंदिरातील पाळणा हलविण्यात आला. सजवलेल्या पाळण्यात भगवान श्रीकृष्णची प्रतिमा ठेवण्यात आली होती. पाळणा हलवून श्रीकृष्णची आरती करण्यात आली. यावेळी शहरातील भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती.

शनिवारी मंदिरात श्री कृष्णाच्या वेभुषेत आलेले लहान चिमुकले कार्यक्रमाचे आकर्षण ठरले. पावसाच्या संतधारेत बालगोपालांनी दहीहंडी फोडून एकच जल्लोष केला.

ट्रस्टचे अध्यक्ष राकेश गुप्ता यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या धार्मिक सोहळ्यासाठी ट्रस्टचे सर्व विश्वस्त व समाजबांधव उपस्थित होते. दुपारी महाआरतीनंतर भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

### पंजाबी सनातन धर्मसभेच्या वतीने सौ. वधवा व जग्गी यांचा सन्मान

स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. सिमरनकौर वधवा यांनी गोवा ते हैदराबाद विमान प्रवासात ३५ हजार फूट उंचीवर एका महिलेचे प्राण वाचवून जीवदान दिल्याबद्दल आणि १६ वर्षीय युवक तनिष्क जग्गी याने क्वांटम मेकॅनिक्स आणि जीवशास्त्र यांचा संगम घडवून जिवंत प्रणालींचे आकार व वर्तन हे क्वांटम अवस्थेतून विकसित होत असल्याचे केलेल्या संशोधनाला जागतिक स्तरावर मान्यता मिळाल्याबद्दल त्यांचा पंजाबी सनातन धर्मसभेच्या वतीने सत्कार करण्यात आला.



स्वातंत्र्य दिनानिमित्त मखदूम सोसायटीच्या वतीने जिल्हा परिषद उर्दू शाळेत वह्यांचे वाटप करण्यात आले.

# विद्यार्थ्यांनी प्रामाणिकपणे शिक्षण घेतले तर उद्याचा भारत नक्कीच उज्ज्वल होईल

## शरफुद्दीन शेख यांचे प्रतिपादन; मखदूम सोसायटीतर्फे स्वातंत्र्यदिनानिमित्त विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप

नगर – स्वातंत्र्य हा आपला जन्मसिद्ध हक्क आहे आणि हा हक्क आपल्या स्वातंत्र्यसैनिकांनी बलिदान देऊन मिळवून दिला आहे. या दिवशी आपण फक्त ध्वजवंदन करून थांबायचे नाही, तर देशासाठी कर्तव्यभावनेने जगण्याची शपथ घ्यायची आहे. शिक्षण हेच खरे शस्त्र आहे. आज मखदूम सोसायटीच्या वतीने मुलांना वह्या वाटप करून ज्ञानाची ज्योत प्रज्वलित करण्याचा छोटासा प्रयत्न करण्यात आला आहे. आजच्या पिढीने प्रामाणिकपणे शिक्षण घेतले, मेहनत केली, तर उद्याचा भारत नक्कीच उज्ज्वल होईल. आपण सर्वजण मिळून समाजात ऐक्य, प्रेम, बंधुता आणि प्रगतीचे आदर्श निर्माण करूया, असे प्रतिपादन अहमदनगर जिल्हा उर्दू साहित्य परिषदेचे सल्लागार शरफुद्दीन शेख यांनी केले.

स्वातंत्र्य दिनानिमित्त मखदूम सोसायटीच्या वतीने केडगाव येथील जिल्हा परिषद उर्दू शाळेत विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले.

यावेळी अहमदनगर जिल्हा उर्दू साहित्य परिषदेचे सल्लागार शरफुद्दीन सर, सचिव आबीद दूल्हेखान, शिक्षिका आसमा बाजी, आयशा सुलताना आदी उपस्थित होते.

या उपक्रमासाठी कवयित्री डॉ. कमर सुरुर, शरफुद्दीन शेख, शफी हज टूर्स ॲण्ड ट्रॅव्हल्स, राजकुमार गुरुनानी, डॉ.दमन काशीद, युनुसभाई तांबटकर, वसंत पारधे, तन्नु महाराज, सुनील भंडारी, दिनेश मंजरतकर आदींचे सहकार्य लाभले.

या वेळी आबीद खान यांनी विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तीचे संस्कार जोपासण्यासाठी मार्गदर्शन केले. सुत्रसंचालन आसमा बाजी यांनी केले. आयेशा सुलताना यांनी आभार मानले.

# आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या कार्डियाक सेंटरची सेवा रुग्णांसाठी नवसंजीवनी

## अशोक भंडारी यांचे प्रतिपादन; मोफत हृदयरोग तपासणी शिबिराला प्रतिसाद, २२२ रुग्णांची मोफत हृदय तपासणी



जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये आचार्य श्री आनंदऋषीजी महाराज यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त हृदयरोग तपासणी व शस्त्रक्रिया शिबिराचे उद्घाटन करताना अशोक भंडारी आदी.

नगर – कमी वयात हृदयरोग होण्याचे प्रमाण वाढले असून, तत्पर व उच्च दर्जाची आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या कार्डियाक सेंटरची सेवा रुग्णांसाठी नवसंजीवनी ठरत आहे. वाढत चाललेले हृदय रोगाचे प्रमाण पाहता, समाजाची गरज ओळखून हॉस्पिटलच्या माध्यमातून उत्तम प्रकारे सुरु असलेल्या आरोग्यसेवेमुळे हॉस्पिटलचे नाव महाराष्ट्रात नावाजले आहे. सेवाभावाने सुरु असलेल्या या आरोग्यसेवेने आनंदऋषीजी हॉस्पिटलने सर्वसामान्यांच्या हृदयात घर करुन मोठा विश्वास संपादन केला असल्याची भावना अशोक भंडारी यांनी व्यक्त केली.

जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये आचार्य श्री आनंदऋषीजी महाराज यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त हृदयरोग तपासणी व शस्त्रक्रिया शिबिर घेण्यात आले. या शिबिराच्या उद्घाटनाप्रसंगी भंडारी बोलत होते. यावेळी महेश सचदेव, अंजली सचदेव, मेहुल (टिनू) भंडारी, परेश मंडलेचा, डॉ. प्रकाश कांकरिया, सतीश (बाबुशेठ) लोढा, वसंत चोपडा, प्रकाश छल्लाणी, सुभाष मुनोत, हृदयरोग तज्ञ डॉ. राहुल अग्रवाल, डॉ. अनिकेत कटारिया, डॉ. अमित थोपटे, डॉ. विनय छल्लाणी आदी उपस्थित होते.

अंजली सचदेव म्हणाल्या की, आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या आरोग्य मंदिरात गोरगरिबांची सेवा घडत आहे. येणाऱ्या रुग्णांकडे माणुसकीच्या भावनेने पाहून त्याच्या जीवनातील वेदना दूर करण्याचे काम हे आरोग्य मंदिर करत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

डॉ. राहुल अग्रवाल म्हणाले की, हॉस्पिटलमध्ये अल्पदरात सेवा देताना सर्वोत्तम दर्जा देखील राखला जातो. दर्जाबाबत तडजोड न करता, रुग्णांना कुटुंबातील सदस्याप्रमाणे सर्वोत्तम सेवा देण्यासाठी हॉस्पिटल प्रशासन सज्ज आहे. शस्त्रक्रियेत इम्पोर्टेड साधने वापरुन मोठ्या शहराच्या धर्तीवर अत्याधुनिक मशीनरी हॉस्पिटलमध्ये सज्ज आहेत. गरजेनुसार रुग्णांची बायपास सर्जरी, हृदयातील झडप बदलणे, हृदयातील छिद्र बुजविणे, लहान मुलांच्या हृदय शस्त्रक्रिया, अँजिओप्लास्टी, अँजिओग्राफी अल्पदरात केल्या जात असल्याचे त्यांनी सांगितले. या शिबिरात २२२ रुग्णांची हृदय रोग तपासणी करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रकाश छल्लाणी यांनी केले. सतीश (बाबुशेठ) लोढा यांनी आभार मानले.

# जिल्हास्तरीय मैदानी ॲथलेटीक्स स्पर्धेच्या तारखेत व ठिकाणामध्ये पावसामुळे बदल

## २३ व २४ ऑगस्ट लोणी येथे रंगणार मैदानी स्पर्धेचा थरार, ऑनलाईन नाव नोंदणीचे आवाहन



नगर – प्रवरा पब्लिक स्कूल, प्रवरानगर येथे १६ व १७ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आलेली जिल्हास्तरीय मैदानी (ॲथलेटीक्स) स्पर्धा पावसामुळे पुढे ढकलण्यात आली आहे. सहकार महर्षी पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांच्या १२५ व्या जयंती निमित्त ही स्पर्धा प्रवरा स्पोर्टस अकॅडमी आणि अ. नगर जिल्हा मेचर ॲथलेटिक्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने २३ व २४ ऑगस्ट रोजी पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय लोणी येथे होणार आहे.

१४, १६, १८, २० व २३ वर्षा आतील मुले व मुलींच्या मैदानी स्पर्धा होणार असून, या स्पर्धेत सहभाग घेण्यासाठी ऑफलाईन पद्धतीने नाव नोंदणी करण्याचे आवाहन छत्रपती पुरस्कार विजेते प्रा. सुनील जाधव, उपाध्यक्ष राजेंद्र कोतकर व सचिव दिनेश भालेराव यांनी केले आहे.

या स्पर्धेच्या विविध गटातील प्रथम दोन क्रमांकाच्या खेळाडूंची जिल्हा संघात निवड होणार आहे. सप्टेंबर महिन्यात पुणे येथील बालेवाडी स्टेडियममध्ये होणाऱ्या राज्यस्तरीय मैदानी स्पर्धेत निवड झालेले खेळाडू आहिल्यानगर जिल्ह्याचे नेतृत्व करणार आहेत. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी खेळाडूंनी २३ ऑगस्ट रोजी स्पर्धा ठिकाणी ऑफलाईन नोंदणी करण्याचे आवाहन केले आहे.

स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंनी आपल्या सोबत मूळ जन्म दाखला व आधार कार्ड सोबत ठेवणे आवश्यक आहे. या स्पर्धेत फक्त अहिल्यानगर जिल्ह्यातील खेळाडूंनी सहभाग नोंदविण्याचे असोसिएशनच्या वतीने म्हटले आहे. ही स्पर्धा ज्यांचे आधार कार्ड अहिल्यानगर जिल्ह्याचे असेल अशा स्पर्धकांना सहभाग घेता येणार आहे. स्पर्धेत सहभागी सर्व खेळाडूंना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी जिल्ह्यातील प्रवरा पब्लिक स्कूलचे प्राचार्य डॉ. प्रदिप दिघे, डॉ. राम पवार, डॉ. उत्तम अनाप, रमेश दळे, रमेश वाघमारे, प्राचार्य संदीप हारदे, राहुल काळे व सर्व क्रीडा शिक्षक व मार्गदर्शक परिश्रम घेत आहेत. माहितीसाठी दिनेश भालेराव ९२२६२३८५३६, श्रीरामसेतू आवारी ९३२२०१५०४६, जगन गवांदे ९८८१३२८१८६ व रावसाहेब मोरकर ९६५७५६५४५६ यांना संपर्क साधण्याचे म्हटले आहे.

# स्व.माधवराव मुळे आबा फक्त शिक्षणमहर्षी नव्हे, तर समाजमहर्षी होते

## ॲड.विश्वासराव आठरे यांचे प्रतिपादन; शिक्षण महर्षी माधवराव मुळे प्रतिष्ठानच्या जिल्हास्तरीय निबंध व चित्रकला स्पर्धेला प्रतिसाद, जिल्ह्यातून ६ हजार स्पर्धक सहभागी; विजेत्यांना बक्षीस वितरण



शिक्षणमहर्षी स्व. माधवराव मुळे प्रतिष्ठान कडून आबांच्या ९३ जयंतीनिमित्त घेण्यात आलेल्या चित्रकला व निंबध स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले.

नगर – स्व. माधवराव मुळे आबा फक्त शिक्षणमहर्षी नव्हे, तर समाज महर्षी होते. जात–पात व धर्मापलीकडे जाऊन त्यांनी कार्य केले. बहुजन समाजाला विकासाच्या प्रवाहात आणण्याच्या विचाराने त्यांचे योगदान व विचार आजही प्रेरणादायी ठरत असल्याचे प्रतिपादन जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सचिव ॲड. विश्वासराव आठरे यांनी केले.

शिक्षण महर्षी माधवराव मुळे प्रतिष्ठान आयोजित जिल्हास्तरीय निबंध व चित्रकला स्पर्धेच्या बक्षीस वितरणप्रसंगी ॲड. आठरे बोलत होते. अशोकभाऊ फिरोदिया शाळेच्या सभागृहात जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे जेष्ठ विश्वस्त सिताराम (अण्णा) खिलारी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाप्रसंगी अहमदनगर एज्युकेशन सोसायटीचे खजिनदार प्रकाश गांधी, प्रतिष्ठानचे अध्यक्ष मुकेश मुळे, उपाध्यक्ष प्राचार्य दत्ता पाटील नारळे, प्राचार्य डॉ. एम.एम. तांबे, डॉ. महेश मुळे, मीनाताई पोटे आदी उपस्थित होते.

पुढे ॲड. आठरे म्हणाले की, माधवराव मुळे आबा यांनी धोरणी नेतृत्व घेऊन समाजाला पुढे घेऊन जाण्याचे कार्य केले. अशा व्यक्तिमत्त्वाच्या माध्यमातून समाज पुढे जातो. जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेला चांगले दिवस आणण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. संस्थेत बंद पडलेल्या सहकारी ग्राहक भंडाराला उर्जित अवस्थेत आणून संस्थेच्या विकासात मोलाची भर टाकली व जिल्ह्यात एक नंबर संस्था नावरुपास आणण्यासाठी त्यांचे योगदान मोलाचे ठरले असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविकात प्राचार्य डॉ. एम.एम. तांबे यांनी शिक्षण महर्षी स्व. माधवराव मुळे यांच्या ९३ व्या जयंतीनिमित्त जिल्हास्तरीय निबंध व चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. यामध्ये ६ हजारपेक्षा अधिक स्पर्धक सहभागी झाले होते. या स्पर्धेत जिल्ह्यातील नामवंत शैक्षणिक संस्थांच्या विद्यालयांनी सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी ही स्पर्धा घेण्यात आली होती. प्रतिष्ठानच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रमांसह दहावी व बारावी गुणवंतांचा सन्मान, करियर मार्गदर्शन केले जाते. पर्यावरण, आरोग्यविषयक उपक्रम राबवतात, पुरोगामी, समाजवादी विचार पुढे घेऊन प्रतिष्ठान माधवराव मुळे आबांच्या विचारधारेने पुढे जात असल्याचे ते म्हणाले.

सिताराम खिलारी म्हणाले की, पुरोगामी महाराष्ट्रातील संत महात्म्यांनी कर्माचा सिध्दांत मांडला. कोणत्याही क्षेत्रात असो, ते काम प्रामाणिक केले पाहिजे. माधवराव मुळे यांच्या कृती व कार्यातून त्यांचे कर्म दिसतात. ग्रामीण भागातून शहरात येऊन त्यांनी आपल्या कार्याने मराठा माणसाला प्रतिष्ठा मिळवून दिली. बहुजन समाजाच्या विकासासाठी शिक्षण क्षेत्रात योगदान दिले. त्यांच्या दूरदृष्टीमुळे जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या न्यू आर्टस महाविद्यालयाने गुणात्मक व संख्यात्मक दर्जा मिळवला. ग्रामीण भागातील मुलांना उच्च शिक्षण मिळावे या उद्देशाने त्यांनी कार्य केल्याचे ते म्हणाले.

प्रकाश गांधी म्हणाले की चित्रकलेने एक व्हिजन समोर उभे राहते. प्रत्येक क्षेत्रात नवीन कलाकृती उभी करताना सर्वात अगोदर चित्र निर्माण होते. तर निबंधातून विचार करण्याची क्षमता वाढते. या स्पर्धेतून विद्यार्थ्यांना चालना देण्याचा प्रयत्न करण्यात आला असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रतिष्ठानचे अध्यक्ष मुकेश मुळे यांनी यावेळी प्रतिष्ठानच्या कार्याची माहिती देऊन विजेत्या स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या.

प्रारंभी दीपप्रज्वलनाने व स्व. माधवराव मुळे यांच्या प्रतिमापूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. चित्रकला व निबंध स्पर्धा प्रत्येकी तीन गटात झाली. चित्रकला स्पर्धेस २६२८ तर निबंध स्पर्धेसाठी ३७२६ असे एकूण ६३५४ स्पर्धकांचा सहभाग लाभला. चित्रकला स्पर्धा शालेय विद्यार्थ्यांसाठी होती. तर निबंध स्पर्धा शालेय व खुल्या गटापर्यंत होती. यामध्ये शिक्षक, पालक व प्राध्यापकांसाठी स्वतंत्र गट निर्माण करण्यात आला होता. दोन्ही स्पर्धेसाठी ज्वलंत, सामाजिक व परिवर्तनवादी विषय देण्यात आले होते.

उपस्थितांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले. स्मृतीचिन्ह, प्रशस्तीपत्र व रोख रक्कम बक्षीसाचे स्वरुप होते. चित्रकला स्पर्धेचे परीक्षण सचिन सांगळे, नारायण शेळके, स्वप्निल मालवंडे, निलेश गणगले, अर्चना निमसे, शारदा पाटील तर निबंध स्पर्धेचे परीक्षण प्रा. दत्तात्रय नकुलवाड, डॉ. नरेंद्र वाव्हळ, जगन्नाथ नारळे, सविता सानप, मिराबाई मोरे, प्रा. गणेश भगत यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. गणेश भगत यांनी केले. प्राचार्य दत्ता पाटील नारळे यांनी आभार मानले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी, बजरंग पाडळकर, लालचंद हराळ, सुनील म्हस्के, महेश मुळे, दिनकर मुळे, निलेश जासूद, सागर देवकर, संतोष आव्हाड, सिकंदर सय्यद आदींसह प्रतिष्ठानचे सदस्य, सभासद, पालक, शिक्षक उपस्थित होते.

# महिलांचे आरोग्य म्हणजे समाजाचा कणा

## सर्व्हायकल कॅन्सर प्रतिबंधासाठी माहेश्वरी सभेचा उपक्रम

### नंदलाल मणियार यांचे प्रतिपादन



अखिल भारतीय माहेश्वरी महासभेच्या प्रेरणेने तसेच बांगड मेडिकल वेल्फेअर सोसायटी व माहेश्वरी सेवा समिती, अहिल्यानगर यांच्या सहकार्याने सर्व्हायकल कॅन्सर व्हॅक्सिनेशन कॅम्पचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचे उदघाटक नंदलाल मणियार यांच्या हस्ते झाले.

नगर – समाजाच्या सर्वांगीण प्रगतीत महिलांचे आरोग्य महत्त्वाची भूमिका बजावते. महिलांचे आरोग्य चांगले असेल तर संपूर्ण कुटुंब आणि पुढे संपूर्ण समाज निरोगी राहतो. त्यामुळे अशा सामाजिक आरोग्य उपक्रमांची गरज आजच्या काळात अधिक आहे. माहेश्वरी समाजाने घेतलेला हा पुढाकार कौतुकास्पद असून, समाजातील प्रत्येक घटकाने यामध्ये सहभागी होणे आवश्यक आहे. आज महिलांना आरोग्यविषयक अनेक समस्या आहेत, मात्र वेळेत तपासणी आणि लसीकरण करून घेतल्यास गंभीर आजारांपासून बचाव होऊ शकतो. अशा उपक्रमांमुळे समाजात आरोग्याविषयी जागरूकता वाढेल आणि एक निरोगी समाज निर्माण होईल, असे प्रतिपादन माहेश्वरी सेवा समितीचे अध्यक्ष नंदलाल मणियार यांनी केले.

अखिल भारतीय माहेश्वरी महासभेच्या प्रेरणेने तसेच बांगड मेडिकल वेल्फेअर सोसायटी व माहेश्वरी सेवा समिती, अहिल्यानगर यांच्या सहकार्याने सर्व्हायकल कॅन्सर व्हॅक्सिनेशन कॅम्पचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचे उदघाटक नंदलाल मणियार यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी डॉ.जगदीश भराडिया, डॉ. नेहा भराडिया, माहेश्वरी सभेचे तालुकाध्यक्ष मुकुंद धुत, जिल्हा सचिव अतुल डागा, सुरेश चांडक, उद्योजक मोहन मानधना, जगन्नाथ बजाज, गीता गिल्डा, प्राजक्ता जाजू, रामेश्वर बिहानी, विठ्ठल भुतडा, महेश काबरा, संजय कलानी, जवाहर मंत्री आदी उपस्थित होते

कॅम्पचे आयोजन अहिल्यानगर तालुका माहेश्वरी सभा यांच्या वतीने करण्यात आले होते. त्यास अहिल्यानगर जिल्हा माहेश्वरी सभा व महाराष्ट्र प्रदेश माहेश्वरी सभा यांच्या मार्गदर्शन लाभले. व श्री माहेश्वरी सेवा समितीच्या सहकार्याने यशस्वी झाली.

डॉ. जगदीश भराडिया यांनी आपल्या भाषणात सांगितले की, सर्व्हायकल कॅन्सर हा महिलांमध्ये वेगाने वाढणारा आजार असून त्याची सुरुवातीच्या टप्प्यात लक्षणे दिसत नाहीत. मात्र, वेळेवर लसीकरण करून घेतल्यास या आजाराला मोठ्या प्रमाणात आळा घालता येतो. महिलांनी आरोग्य तपासणीकडे दुर्लक्ष न करता नियमित चाचण्या करून घ्याव्यात, यामुळे वेळेत निदान होऊन योग्य उपचार शक्य होतात.




संस्कार प्ले ग्रुप व नर्सरी स्कूल मध्ये १५ ऑगस्टच्या कार्यक्रमात सहभागी झालेल्या शिक्षकांसह बाळगोपाळ आदी.

# संस्कार प्ले ग्रुप व नर्सरी स्कूलमध्ये स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा

नगर – अरणगाव तालुका जिल्हा अहिल्यानगर येथील संस्कार प्ले ग्रुप व नर्सरी स्कूल मध्ये १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनी ध्वजारोहन करण्यात आले. याप्रसंगी चिमुकल्या विद्यार्थ्यांनी विविध राज्यांच्या वेशभूषा परिधान करून राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देवून तसेच देश मेरा रंगीला या गाण्यावरती ठेका धरला. इंजि.निलेश धाडगे, राकेश एनसिया यांनी ध्वजपूजन करून कार्यक्रमाची सुरुवात केली. त्यानंतर राष्ट्रगीत व ध्वजगीत झाले. विद्यार्थ्यांनी नन्ना मुन्ना राही हूँ, देश का सिपाही हु या गाण्यावरती नृत्य प्रस्तुत केले.

श्रीपाद टॉईज वर्ल्डचे संचालक जयंत ठाणेकर यांच्या उपस्थितीमध्ये १५ अगस्त की सुबह ही चित्रकला स्पर्धा घेण्यात आली.

कार्यक्रमाचा शेवट विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून, वंदे मातरम या गीताने झाली. प्ले ग्रुपच्या संचालिका प्राध्यापिका सौ. अमृता अमोल देवकर यांनी आभार मानले.



## पद्मशाली सोशल फाउंडेशन ट्रस्टतर्फे जिल्हा परिषद शाळेत दप्तर व वह्यांचे वाटप

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, दळण वस्ती, लोणी रोड, सुपा ता. पारनेर येथे पद्मशाली सोशल फाउंडेशन ट्रस्टतर्फे विद्यार्थ्यांना स्कूल बॅग व वह्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी प्राथमिक शाळेच्या शिक्षिका सौ. कीर्ती म्याना व सौ. वंदना आसने यांनी उपक्रमाचे कौतुक केले.

## पर्युषण पर्वा निमित्त महेश मंगल कार्यालयात ब्याळूची व्यवस्था

नगर – जैन धर्मातील पवित्र पर्युषण महापर्वानिमित्त आनंद गुरू परिवाराच्या वतीने चोवीहार (ब्याळू) ची व्यवस्था केली आहे. २० ते २६ ऑगस्ट पर्यंत सायंकाळी ५ ते ६.३० यावेळेत रामचंद्र खुंट, बन्सीम हाराज मिठाईवाले शेजारी महेश मंगल कार्यालयात ही व्यवस्था असेल. भाविकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# मधुमेहावर मोफत उपचार सेवेचा नगरमध्ये शुभारंभ



सकल माळी समाजाच्या वतीने मधुमेहावर (शुगर) मोफत उपचार सेवेचा शुभारंभ डॉ. रणजित सत्रे यांच्या हस्ते झाला.

नगर – अहिल्यानगर शहरातील नवीन टिळक रोड परिसरातील द टि हाऊस येथे सकल माळी समाजाच्या वतीने नुकतेच 'शुगरवर मोफत उपचार' या सेवेचा शुभारंभ झाला. हा उपक्रम दररोज सकाळी ६ ते ८ या वेळेत राबवला जाणार असून, रोज अवघ्या १५ मिनिटांच्या उपचारामुळे महिनाभरात शुगरची गोळी बंद होण्याची ९९ टक्के शक्यता असल्याचे आयोजकांनी सांगितले. या क्रार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. रणजीत सत्रे यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान सकल माळी समाजाचे अध्यक्ष किशोर डागवाले यांनी भूषवले तर प्रा. माणिकराव विधाते हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्तविक राजेंद्र पडोळे यांनी केले.

यावेळी बोलताना डॉ. रणजीत सत्रे म्हणाले की, आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत मधुमेह हा एक गंभीर आणि वेगाने वाढणारा आजार बनला आहे. औषधोपचारांसोबतच जीवनशैलीत बदल आणि पर्यायी उपचार पद्धतींचा वापर केल्यास उत्तम परिणाम मिळू शकतात. सकल माळी समाजाने राबवलेला हा मोफत उपचार उपक्रम निःसंशयपणे अनेक रुग्णांसाठी वरदान ठरेल. आधुनिक वैद्यकशास्त्रासोबतच अशा उपचार पद्धतींचा समन्वय साधणे ही काळाची गरज आहे. समाजातील प्रत्येक घटकाला आरोग्यसेवा सहज, सुलभ आणि मोफत मिळावी यासाठी अशा उपक्रमांना अधिक पाठबळ मिळाले पाहिजे.

मधुमेह हा आजार एकदा झाला की तो पूर्णपणे बरा होत नाही, पण त्यावर योग्य नियंत्रण मिळवता येते. नियमित तपासण्या, संतुलित आहार, शारीरिक व्यायाम आणि वेळेवर औषधे घेतल्यास रुग्ण निरोगी आणि सक्रिय जीवन जगू शकतो. शुगरवर नियंत्रण ठेवणे हे केवळ डॉक्टरांचे काम नाही, तर रुग्णाचीही जबाबदारी आहे. आज या ठिकाणी सुरू झालेली मोफत उपचार सेवा अनेकांसाठी मार्गदर्शक आणि प्रेरणादायी ठरेल. ग्रामीण आणि शहरी भागातील रुग्णांनी अशा सेवा केंद्रांचा लाभ घ्यावा, कारण यामुळे औषधांवरील अवलंबित्व कमी होऊ शकते आणि जीवनाची गुणवत्ता वाढते. प्रत्येकाने आरोग्याबाबत जागरूक होऊन अशा उपक्रमांना पाठिंबा द्यावा.

यावेळी सुरेश आंबेकर, प्रकाश इवळे, अर्जुनराव बोरुडे, अनिल इवळे, सुरेश जाधव, गोरख पडोळे, भन्ते धम्मपाल सुधाकर कानडे, संजय कानडे, माधवराव भुतारे, भानुदास बनकर, रमेश चिपाडे, एकनाथ व्यवहारे, हरिभाऊ पवार आदी उपस्थित होते

सूत्रसंचालन अनिल इवळे यांनी केले. प्रकाश इवळे यांनी आभार मानले.

# जय आनंद फाउंडेशनच्यावतीने डाळमंडई येथे पर्युषण पर्वानिमित्त चौविहार (ब्याळु) व्यवस्था

नगर – जैन धर्मातील पर्युषण महापर्वास २० ऑगस्टपासून सुरुवात होत आहे. २० ते २६ ऑगस्टपर्यंत महापर्वानिमित्त नगरमधील जय आनंद फाउंडेशनच्यावतीने जैन समाजातील नागरिकांसाठी मोफत जेवणाची चौविहार (ब्याळू) व्यवस्था केली आहे. शहरातील दाळमंडई येथील राजेशकुमार कमलेशकुमार गुगळे यांच्या निवासस्थानी या चौविहार (ब्याळू) व्यवस्था करण्यात आली आहे, अशी माहिती अध्यक्ष अमित काबरा यांनी दिली.

२० ते २६ ऑगस्ट दरम्यान दररोज सायंकाळी ५ ते ६.३० या कालावधीत भोजन व्यवस्था चालू राहणार आहे. डाळमंडई, आडतेबाजार, मार्केटयार्ड, कापड बाजारमधील व्यापारी तसेच बाहेरगावाहून खरेदी विक्रीसाठी आलेल्या जैन समाजातील व्यावसायिक अशांना या भोजन व्यवस्थेचा लाभ घेता येणार आहे. मागील ११ वर्षांपासून फाउंडेशन हा उपक्रम राबवत आहे.

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी होणाऱ्या चौविहार (ब्याळु) ची उत्तम व्यवस्था करण्यात आली असून समाजबांधवांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन मर्चंट्स बँकेचे संचालक कमलेश भंडारी व फाउंडेशनचे माजी अध्यक्ष गौरव बोरा, रितेश पारख यांनी केले आहे.

# अर्थजगत

# शेअर बायबॅकवरील करबदलाचे परिणाम




जुलै महिन्यात मांडलेल्या केंद्र सरकारच्या अर्थसंकल्पात शेअर बायबॅक संदर्भात १ ऑक्टोबर २०२४ पासून कर व्यवस्थेत एक मोठा बदल करण्यात आला. त्यानुसार कंपन्यांनी शेअर परत खरेदी केल्यास त्यावरील कर भरण्याची जबाबदारी आता कंपन्यांऐवजी थेट शेअरहोल्डर्सवर टाकण्यात आली आहे. याआधी या व्यवहारात कंपन्यांना कलम ११५ ठअ अंतर्गत जवळपास २३.३ टक्के कर भरावा लागत असे आणि गुंतवणूकदारांना मिळणारा परतावा पूर्णपणे करमुक्त असे. परंतु गतवर्षीच्या बदलांनुसार संपूर्ण बायबॅक रक्कम कलम २(२२)(एफ) अंतर्गत 'डीम्ड डिव्हिडंड' म्हणून गणली जातो आणि ती थेट शेअरहोल्डर्सच्या कर श्रेणीनुसार करपात्र ठरतो. यामुळे उच्च उत्पन्न गटातील गुंतवणूकदारांना आधी कंपन्यांनी भरलेल्या २३.३ टक्क्यांऐवजी जवळपास ३५.८८ टक्क्यांपर्यंत कर भरावा लागू शकतो.

महत्त्वाची बाब म्हणजे शेअर्सच्या खरेदी किमतीचा विचार या डीम्ड डिव्हिंडड विरुद्ध करता येत नाही, तर ती केवळ एक काल्पनिक भांडवली तोटा म्हणून गणली जाते. हा तोटा भविष्यातील भांडवली नफ्याविरुद्ध समायोजित करता येतो किंवा आठ वर्षांपर्यंत पुढे नेता येतो. परंतु या दरम्यान गुंतवणूकदारांना खिशातून जास्त कर मोजावे लागणार हे निश्चित आहे. या बदलामुळे बायबॅकची कर कार्यक्षमता मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे. यामुळे कंपन्यांसाठी बायबॅक हा नफा परतविण्याचा आकर्षक मार्ग राहिलेला नाही, विशेषतः ज्या गुंतवणूकदारांचा कर दर जास्त आहे त्यांच्यासाठी हा मार्ग तोट्याचा ठरत आहे. परिणामी लाभांश वितरणाला पुन्हा प्राधान्य मिळण्याची शक्यता वाढली आहे. लाभांशावर साधारण २०% टीडीएस आकारला जातो, तसेच विदेशी गुंतवणूकदारांना कर करारांमधून (डीटीएए) ५% ते १५% दरम्यान सवलत मिळू शकते आणि फॉरेन टॅक्स क्रेडिट यंत्रणेच्या आधारे हा कर त्यांच्या मूळ देशातील करपात्रतेविरुद्ध समायोजित करता येतो. त्यामुळे जागतिक गुंतवणूकदारांसाठी लाभांश तुलनेने अधिक सोयीस्कर पर्याय ठरु शकतो.

**वेध बाजाराचा**

नवीन व्यवस्थेमुळे गुंतवणूकदारांना आपल्या पोर्टफोलिओ आणि कर नियोजनाचा पुन्हा विचार करावा लागणार आहे. आता अल्पकालीन परताव्याऐवजी दीर्घकालीन भांडवली वाढीला प्राधान्य दिले जाईल. कारण सूचीत शेअर्सवरील दीर्घकालीन भांडवली नफा फक्त १२.५% करपात्र आहे, जो उच्च उत्पन्न गटातील स्लॅब रेटपेक्षा बऱ्यापैकी कमी आहे. यामुळे चांगल्या कंपन्यांमध्ये दीर्घकालीन गुंतवणूक करण्याकडे कल वाढू शकतो. भारताच्या जागतिक स्पर्धात्मकतेवर या बदलाचा फारसा परिणाम होणार नाही असे मानले जाते, कारण भारतातील कॉर्पोरेट कर दर (साधारण २५.१७% आणि काही उत्पादन कंपन्यांसाठी १७.१६%) तुलनेने स्पर्धात्मक आहेत. शिवाय लाभांश वितरण आणि त्यावरील करव्यवस्था जागतिक निकषांशी सुसंगत असल्यामुळे परदेशी गुंतवणूकदारांना या बदलाचा फारसा धक्का बसणार नाही. एकूण पाहता, सरकारने करपद्धतीत पारदर्शकता आणणे आणि आंतरराष्ट्रीय निकषांशी सुसंगती साधणे हा उद्देश डोळ्यापुढे ठेवून ही बदललेली रचना लागू केली आहे. मात्र गुंतवणूकदारांसाठी हे नियोजन अधिक गुंतागुंतीचे झाले असून, पोर्टफोलिओ मॅनेजमेंट करताना त्यांना आता कर संरचनेचा काटेकोरपणे विचार करावा लागेल. कंपन्या आणि गुंतवणूकदार या दोघांनाही आता नफा परतविण्याच्या पद्धतीत आणि गुंतवणूक धोरणात हळूहळू बदल करावे लागतील हे निश्चित आहे.

# गुंतवणुकीतील सुरक्षितता महत्त्वाची

पर्सनल फायनान्समध्ये गुंतवणूक म्हणजे आपल्या निधीला अशा ठिकाणी लावणे, जिथे भविष्यात तुम्हाला सुरक्षित आणि समाधानकारक परतावा मिळेल. कुठलीही गुंतवणूक करण्यापूर्वी तिची कायदेशीर वैधता, बाजारातील मागणी आणि सरकारी सुरक्षा अशा तिन्ही बाबींचा अभ्यास गरजेचा असतो. जर सध्याच्या उत्पन्नात




अमुक रेसिडेन्शियल प्रॉपर्टी घेण्याची परवानगी मिळत नसेल, तर अनावश्यक वाळवंटी किंवा जंगलजमिनी घेण्यात अर्थ नाही. त्याऐवजी पैसे बँक एफडी, सरकारी बॉण्ड, रिटायरमेंट फंड किंवा इतर सुरक्षित योजनांमध्ये लावावेत. गुंतवणुकीत संयम ठेवल्यास वर्षानुवर्षे मोठा फायदा होतो.

मोठ्या शहरांच्या बाहेरील भागात, रहदारी-वर्दळ, पायाभूत सुविधा कमी असणाऱ्या भागात मोठ्या प्रमाणावर प्लॉट विक्रीची हालचाल दिसते. इथे पैसे गुंतवून भविष्यात भांड्वल वाढवेल असा लोकांचा समज असतो. पण बरेचदा काही महिन्यांनंतर सरकार त्या जमिनीला बेकायदेशीर घोषित करते आणि गुंतवणूकदारांचे मोठे नुकसान होते. म्हणूनच, ज्या प्रॉपर्टीत तुम्ही गुंतवणूक करणार आहात ती कायदेशीर आहे की नाही हे आधी तपासणे आवश्यक आहे.

प्रत्येक जण आपली संपत्ती वाढवून भविष्य सुरक्षित करू इच्छितो. पण लोक अनभिज्ञतेमुळे किंवा लोभामुळे बेकायदेशीर प्रॉपर्टीत पैसे गुंतवतात. ही गुंतवणूक परतावा तर देतच नाही, उलट भांडवल नष्ट करते. शिवाय यामुळे मानसिक आणि आर्थिक आरोग्यावर ताण येतो तो वेगळाच ! म्हणूनच योग्य मार्गदर्शनाशिवाय केलेली गुंतवणूक म्हणजे धोक्याला आमंत्रण.

आजकाल बेकायदेशीर गुंतवणुकीचा सर्वात मोठा आधार म्हणजे सोशल मीडियावरील जाहिराती ह 'फक्त काही हप्त्यांत प्लॉट', 'अर्ध्या किमतीत जमीन', 'आज घ्या, उद्या दुप्पट मिळवा' अशा आकर्षक घोषणांमुळे लोक या जमिनीत-मालमत्तेत गुंतवणूक करण्याकडे आकर्षित होतात. प्रत्यक्षात नकाशे, मालकीचे हक्क, आणि सर्व सरकारी परवाने मिळालेले नसतात. त्यामुळे अशा प्रलोभनांपासून दूर राहणेच फायदेशीर ठरते. थोडक्यात काय, तर नफा, मानसिक समाधान आणि आर्थिक सुरक्षा या तिन्ही बाबी एकत्र साध्य करण्यासाठीच गुंतवणूक करावी. गुंतवणुकीपूर्वी ती तुम्हाला सुरक्षित ठेवते का, याचा विचार करा. अन्यथा, भविष्य धोक्यात येऊ शकते.

# एका वर्षात एकाहून अधिक घरे विकताय?

आयकरातील कलम ५४ हे दीर्घकालीन भांडवली नफ्यावर कर बचतीसाठी महत्त्वाचे साधन आहे. जर एखाद्याने आपले घर विकून मिळालेला दीर्घकालीन भांडवली नफा ठरावीक कालमर्यादेत भारतात नवीन घर खरेदीमध्ये किंवा बांधकामात गुंतवला, तर त्या नफ्यावर करातून सूट मिळते. ही सूट फक्त व्यक्ती (इनडिव्हिज्युअल्स) किंवा हिंदू अविभाजित कुटुंब (एचयुएफ) यांनाच लागू आहे. विक्रीपूर्वी एक वर्ष किंवा विक्रीनंतर दोन वर्षांत नवीन घर खरेदी करता येते. बांधकामाच्या बाबतीत तीन वर्षांची मुदत असते. सर्व गुंतवणूक भारतातच करावी लागते. जर लगेच गुंतवणूक करता



आली नाही, तर रक्कम कॅपिटल गेन्स अकौंट स्किममध्ये जमा करावी लागते.

**एक वर्षात अनेक घरे विकल्यास काय?**

कायद्याचा शब्दशः अर्थ घेतल्यास, प्रत्येक विक्रीवरील नफा स्वतंत्रपणे नवीन घर खरेदी किंवा बांधकामात गुंतवला तर तांत्रिकदृष्ट्या प्रत्येक व्यवहारावर कलम ५४ अंतर्गत सूट मिळू शकते. परंतु प्रत्यक्षात कर विभाग आणि न्यायालये या सवलतीचा गैरवापर होऊ नये म्हणून काही बंधने लावतात.

२०१९ च्या बदलानुसार, आता एकदाच आयुष्यात २ घरे खरेदी करून सूट घेण्याची संधी आहे, पण ही सुविधा फक्त तेव्हाच आहे जेव्हा भांडवली नफा २ कोटी रुपयांपेक्षा कमी असतो. म्हणजेच, एखाद्याने दोन घरे विकली आणि त्या दोन्हीवरचा नफा एकत्र करून फक्त एकच नवीन घर खरेदी केले, तर सूट मिळते. जर वेगवेगळ्या विक्रीवर वेगवेगळी घरे खरेदी केली, तर २ पेक्षा जास्त घरांसाठी सूट घेता येत नाही. २ घरांची सवलतही आयुष्यात एकदाच घेता येते.

**धोका कुठे आहे?**

जर नवीन घर खरेदी/बांधकाम ठरावीक मुदतीत पूर्ण झाले नाही, किंवा रक्कम योग्यरीतीने कॅपिटल गेन अकौंट स्कीममध्ये जमा केली नाही, तर हा नफा दीर्घकालीन भांडवली नफा म्हणून करपात्र ठरतो. म्हणूनच कर सल्लागार सातत्याने सांगतात की, ज्यांच्याकडे अनेक घरे आहेत त्यांनी विक्रीचे व्यवहार वेगवेगळ्या आर्थिक वर्षांत करणे आणि गुंतवणुकीची वेळ नीट जुळवणे जास्त फायदेशीर ठरते. तसेच व्यवहाराचे सर्व पुरावे, करारपत्रे, नोंदणी कागदपत्रे नीट जतन करणे अत्यंत गरजेचे आहे. सारांशाने असे म्हणता येईल की, तुम्ही एका वर्षात अनेक घरे विकू शकता. नियमांचे काटेकोर पालन आणि वेळेचे नियोजन यावरच कर बचत अवलंबून आहे.

*जर तुम्ही कोणतीही निवासी किंवा व्यावसायिक मालमत्ता मालकी हक्काने घेतली असेल आणि ती भाड्याने दिली असेल, तर त्या भाडे उत्पन्नाची नोंद 'गृहमालमत्तेतील उत्पन्न' या शीर्षकाखाली आयकर विवरणपत्रात करणे आवश्यक आहे. पण प्रश्न असा आहे की या भाडेउत्पन्नावर किती कर द्यावा लागतो? ही गणना आयकर कायद्यात दिलेल्या एका विशिष्ट सूत्रावर आधारित असते. ते सुरुवातीला अवघड वाटू शकते. भाड्याने देणे म्हणजे निवासी घर, व्यावसायिक जागा किंवा रिकामी जमीन इतरांना काही कालावधीसाठी भाड्याने देणे. यातून मालकाला भाडे उत्पन्न मिळते. हे संपूर्ण वर्षासाठी किंवा काही महिन्यांसाठी असू शकते. मालमत्ता रिकामी ठेवली गेली किंवा इतर कारणासाठी वापरली गेली, तरीही तिला कल्पित भाडे मालमत्ता (डीम्ड लेटआऊट प्रॉपर्टी) मानले जाते.*

# मालमत्तेतून मिळणाऱ्या भाडेउत्पन्नाचे करगणित







नरेंद्र क्षीरसागर

गणनेतील महत्त्वाचे घटक

- वार्षिक मूल्य (ॲन्युअल व्हॅल्यू) : वार्षिक मूल्य म्हणजे मालमत्तेतून मिळू शकणारे संभाव्य भाडे.
  * सकल वार्षिक मूल्य (गीएव्ही-ग्रॉस ॲन्युअल व्हॅल्यू) : सकल वार्षिक मूल्य म्हणजे प्रत्यक्ष मिळालेले भाडे किंवा न्याय्य भाडे यांपैकी जास्त रक्कम. मालमत्ता रिकामी असली तरी अपेक्षित भाडे धरले जाते.
- **निव्वळ वार्षिक मूल्य ( नेट ॲन्युअल व्हॅल्यू- एएव्ही)** : निव्वळ वार्षिक मूल्य = सकल वार्षिक मूल्य हवजा महानगरपालिका कर.
- **महानगरपालिका कर** : हा स्थानिक प्रशासनाकडे भरलेला कर असतो. हा कर मालकाने भरला असेल तरच तो वजा करता येतो.
- **मानक वजावट (स्टँडर्ड डिडक्शन)** : निव्वळ वार्षिक मूल्यावर (एनएव्ही) ३० टक्के निश्चित वजावट मिळते. हा खर्च दुरुस्ती व देखभाल यासाठी मानला जातो.
- **गृहकर्जावरील व्याज** : जुन्या आणि नव्या दोन्ही करप्रणालींमध्ये घर खरेदी, बांधकाम किंवा दुरुस्ती करण्यासाठी घेतलेल्या कर्जावरील व्याजाची पूर्ण वजावट घेता येते.
- **मूळ रकमेची परतफेड** : जुन्या कर प्रणालीमध्ये गृहकर्जाच्या मूळ रकमेवरील परतफेडीवर १.५ लाख रुपये प्रतिवर्ष वजावट मिळते. नवीन कर प्रणालीमध्ये ही सवलत नाही.
- **तोटा समायोजन** : जुन्या कर प्रणालीमध्ये घरमालमत्तेतील तोटा पगार वा व्यवसाय यांसारख्या इतर उत्पन्नाशी २ लाखापर्यंत समायोजित करता येतो. नवीन प्रणालीमध्ये नाही.
- **तोटा पुढे नेणे** : जुन्या कर प्रणालीमध्ये २ लाखांपेक्षा जास्त तोटा पुढील ८ वर्षे पुढे नेता येतो. नवीन प्रणालीमध्ये नाही.

**गणना करण्याची पद्धत**

१. सकल वार्षिक मूल्य निश्चित करणे
२. महानगरपालिका कर वजा करणे
३. निव्वळ वार्षिक मूल्यावर ३०% मानक वजावट लागू करणे
४. गृहकर्जावरील व्याज वजा करणे
५. अंतिम गृहमालमत्तेतील उत्पन्न काढणे

**उदाहरणार्थ**, राहुल रॉय यांचा स्वतःचा मुंबईतील निवासी फ्लॅट भाड्याने दिला असून त्यातून ३० हजार रुपये मासिक भाडे मिळते. म्हणजेच दरवर्षी ३.६० लाख रुपये भाड्यापोटी राहुल यांना मिळतात.



यापैकी महानगरपालिका कर १५ हजार रुपये आणि गृहकर्जावरील व्याजापोटी ३.५० लाख रुपये द्यावे लागतात.

**१. सकल वार्षिक मूल्य =** ३,६०,००० रुपये
**२. निव्वळ वार्षिक मूल्य =** ३,६०,०००-१५,००० = ३,४५,००० रुपये
**३. मानक वजावट =** ३०% गुणिले ३,४५,००० = १,०३,५०० रुपये
उत्पन्न (व्याजापूर्वी) = ३,४५,००० हवजा १,०३,५०० = २,४१,५०० रुपये
**४. व्याज वजा =** २,४१,५०० हवजा ३,५०,००० = -१,०८,५०० रुपये
**निष्कर्ष** : १,०८,५०० रुपयांचा तोटा.
हा तोटा पुढील ८ वर्षे पुढे नेता येतो आणि भविष्यातील भाडे उत्पन्नाशी समायोजित करता येतो.

# विम्याची रक्कम नॉमिनींनाच मिळण्यासाठी...

**विम्याची रक्कम नॉमिनींनाच मिळण्यासाठी...**

कोणत्याही व्यक्तीचा जीवन विमा घेताना मुख्य उद्देश हा असतो की आपल्या अचानक निधनानंतर कुटुंब आर्थिकदृष्ट्या सुरक्षित राहावे. पण विवाहित पुरुषांसाठी एक अतिशय प्रभावी पर्याय आहे जो फार कमी लोकांना ठाऊक असतो. विवाहित स्त्रियांच्या संपत्ती अधिनियम (मॅरीड वुमन प्रॉपर्टी ॲक्ट - एमडब्ल्यूपीए) १८७४ अंतर्गत जीवन विमा खरेदी करणे.

**सामान्य परिस्थिती काय असते?**

सामान्यः प्रत्येक जण विमा पॉलिसी घेताना आपली पत्नी, मुले, आई-वडील किंवा इतर कुटुंबीयांना नामनिर्देशित करू शकतो. २०१५ च्या विमा कायदा दुरुस्तीमुळे पत्नी व मुले हे बेनिफिशियल नॉमिनी ठरतात आणि त्यांनाच रक्कम मिळायला हवी. पण धोका असा आहे की पॉलिसीधारक पॉलिसीच्या मुदतीत नामनिर्देश बदलू शकतो. म्हणजे पत्नी व मुलांचा हक्क कधीही धोक्यात येऊ शकतो.

दुसरा मोठा धोका कर्जाशी संबंधित आहे. तुमच्यावर मृत्यूसमयी कर्ज बाकी असेल, तर कर्जदार विम्याची रक्कम वसूल करण्यासाठी दावा करू शकतात. अशा वेळी तुमच्या कुटुंबाला पूर्ण रक्कम मिळेलच याची खात्री राहत नाही.

**एमडब्ल्यूपीए काय करते?**

या कायद्याच्या कलम ६ नुसार विवाहित पुरुषाने स्वतःच्या जीवनावर विमा पॉलिसी घेताना स्पष्टपणे नमूद केले की ही पॉलिसी पत्नी किंवा पत्नी व मुलांच्या फायद्यासाठी आहे, तर पतीच्या पश्चात ती पॉलिसी कायदेशीर ट्रस्टमध्ये रूपांतरित होते. परिणामी हपॉलिसीची संपूर्ण रक्कम फक्त पत्नी आणि/किंवा मुलांनाच मिळते. कोणत्याही कर्जदाराला, बँकेला किंवा न्यायालयालाही या रकमेवर दावा करता येत नाही. ही रक्कम मृत व्यक्तीच्या मालमत्तेचा भाग मानली जात नाही. स्वतः पॉलिसीधारकाला देखील नंतर यात बदल करण्याचा अधिकार नसतो.



**कसा वापरायचा?**

- विमा खरेदी करताना पॉलिसी एमडब्ल्यूपीए अंतर्गत हवी असे स्पष्ट मागणे आवश्यक आहे.
- हे फक्त पॉलिसी घेतानाच करता येते; नंतर एमडब्ल्यूपीए जोडता येत नाही.
- विमा कंपनीकडे साध्या फॉर्ममध्ये एमडब्ल्यूपीए अंतर्गत निवड करावी लागते.

**का महत्वाचे आहे?**

उदाहरणार्थ, मोहित नावाच्या विवाहित व्यक्तीने १ कोटी रुपयांची टर्म पॉलिसी एमडब्ल्यूपीए अंतर्गत पत्नी व मुलांच्या नावे घेतली. त्याच्या आयुष्यात २५ लाखांचे गृहकर्ज, ४ लाखांचे वाहन कर्ज व ५ लाखांचे वैयक्तिक कर्ज असेल. जर अपघाताने त्याचे निधन झाले, तरी पत्नीला संपूर्ण १ कोटी रुपये मिळतात. कोणताही कर्जदार, बँक किंवा नातेवाईक या रकमेवर हक्क सांगू शकत नाही. याउलट एमडब्ल्यूपीए नसेल तर ही रक्कम कर्जफेडीसाठी वापरली जाऊ शकते आणि कुटुंब आर्थिकदृष्ट्या संकटात सापडू शकते. बहुतेकांना वाटते की जीवन विम्याची रक्कम आपोआप कर्जदारांपासून सुरक्षित असते. पण प्रत्यक्षात एमडब्ल्यूपीए शिवाय विमा रक्कम मृत व्यक्तीच्या संपत्तीचा भाग ठरते आणि कर्जदार दावा करू शकतात.

# फ्रीलान्सर्ससाठी करसापळे

डिजिटल युगात फ्रीलान्स काम, यूट्यूब मॉनेटायझेशन, ब्रँड डील्स किंवा ॲफिलिएट इन्कम अशा सर्व प्रकारच्या उत्पन्नावर आता आयकर खात्याची नजर आहे. विशेषतः फॉर्म २६अड आणि एआयएस (ॲन्युअल इन्फर्मेशन स्टेटमेंट) सारख्या तंत्रज्ञानामुळे प्रत्येक व्यवहार करविभागाला स्पष्ट दिसतो. गिग्ज मोजायच्या नसतात ही समजूत आता धोकादायक ठरू शकते. कर सल्लागारांच्या मते, उत्पन्न कुठूनही मिळाले तरी ते करपात्र आहे. नव्या नियमांमुळे आणि कठोर डेटा-शेअरिंग यंत्रणेमुळे २०२५ह२६ या आयकर वर्षात डिजिटलविश्वात काम करणाऱ्यांनी काही गोष्टींकडे विशेष लक्ष द्यायला हवे.

**१) साईड इन्कम करमुक्त आहे असा गैरसमज**

बऱ्याच जणांना पगारासोबत मिळणारे साईड गिग्स जसे की डिझाईन, कोचिंग, कंटेंट रायटिंग यावर कर लागत नाही असे वाटते. प्रत्यक्षात हे उत्पन्न 'प्रॉफिट अँड गेन्स फ्रॉम बिझनेस ऑर प्रोफेशन' म्हणून धरले जाते आणि आयटीआर-३ किंवा आयटीआर-४ मध्ये दाखवणे बंधनकारक आहे. हे दाखवले नाही तर नंतर नोटीस किंवा दंड होऊ शकतो.

**२) इनव्हॉइस आणि डॉक्युमेंटेशनकडे दुर्लक्ष**

ग्राहकांनी पेमेंट युपीआय, एनईएफटी किंवा पेपलमधून केले तरी इनव्हॉइस नसेल तर तुमचे उत्पन्न सिद्ध करणे किंवा खर्च दाखवणे अवघड होऊ शकते. त्यामुळे प्रत्येक प्रोजेक्टचे इनव्हॉइस तयार करणे आवश्यक आहे. व्यापार, झोहो किंवा गूगल




राधिका बिवलकर

शीट्ससारखी मोफत टूल्स वापरता येतात. अचूक नोंदी भविष्यात करबचतीला मदत करतात.

**३) कामाशी संबंधित खर्च न दाखवणे**

मोबाईल बिल, इंटरनेट चार्जेस, कॅमेरा उपकरणे, एडिटिंग सॉफ्टवेअर, होम-ऑफिसचे भाडे हे सर्व खर्च करवजावट म्हणून दाखवता येतात. मात्र, अनेक जण रेकॉर्ड ठेवत नाहीत आणि त्यामुळे करबचत गमावतात. सर्व बिल जपून ठेवणे आणि बँक स्टेटमेंटमधून पेमेंट लिंक करणे फायदेशीर ठरते.

**४) ॲडव्हान्स टॅक्सकडे दुर्लक्ष** : पगारदार कर्मचाऱ्यांच्या उत्पन्नावर टीडीएस आपोआप कापला जातो; पण फ्रीलान्सर्स किंवा डिजिटल वर्कर्ससाठी तसे नसते. जर तुमचे करदायित्व १०,००० रुपयांपेक्षा जास्त असेल तर तुम्ही तिमाही हप्त्यांमध्ये ॲडव्हान्स टॅक्स भरायलाच हवा. हे न भरल्यास कलम २३४ बी आणि २३४सी अंतर्गत व्याज आकारले जाते.

# म्युच्युअल फंडातील नवीन गुंतवणूकदार आहात?

नवीन म्युच्युअल फंड गुंतवणूकदारांकडून होणारी सर्वात सामान्य चूक म्हणजे शेअर बाजाराचे स्वरूप नीट न समजणे. अनेकांना दरवर्षी उत्कृष्ट परतावा मिळेल अशी अवास्तव अपेक्षा असते. एखादा फंड एखाद्या वर्षी जोरदार कामगिरी करताना दिसला की त्यात लगेच गुंतवणूक करण्याचा मोह बहुतेकांना होतो आणि कामगिरी ढासळली की त्या फंडापासून दूर राहण्याची इच्छा होते. खरं तर बाजारात चढ-उतार आणि त्यामुळे फंडातील गुंतवणुकीच्या एकूण रकमेत बदल होणे हा एक अविभाज्य भाग आहे. जे वाढते ते सतत वाढत नाही आणि जे घसरते ते कायम घसरत नाही, हा याचा मुलभूत नियम आहे. खराब कामगिरीच्या काळात संयम राखणे हीच खरी कसोटी असते. सर्वात सोपा उपाय म्हणजे साध्या इंडेक्स फंडमध्ये गुंतवणूक टिकवून ठेवणेहउदा. निफ्टी ५० किंवा सेन्सेक्स. जास्त परताव्याची अपेक्षा असल्यास निफ्टी नेक्स्ट ५० मध्ये गुंतवणूक करणे.

सतत 'महिन्यातील सर्वोत्तम' फंडाकडे ओढा ठेवणारा गुंतवणूकदार लवकरच 'डायव्हर्सिफाइड' पोर्टफोलिओ तयार करतो, जो प्रत्यक्षात महागड्या इंडेक्स फंडासारखा दिसतो. आपला पोर्टफोलिओ नेहमीच यशस्वी राहील असे नाही, हे मान्य करणे आवश्यक आहे आणि बाजाराचे चक्रीय स्वरूप लक्षात घेणे गरजेचे आहेह. एखादी थीम वा कल्पना आधीच खूप परतावा देऊन गाजली असेल, तेव्हा त्यात गुंतवणूक करणे ही सर्वात चुकीची वेळ असते, हे लक्षात ठेवा.

शेअर बाजारातील परतावा हा टप्प्याटप्प्याने येतो. हकाही वर्षे उत्तम, काही वर्षे खराब. म्हणून नेहमीच बाजारात गुंतलेले राहणे गरजेचे आहे.




संतुलित मालमत्ता वाटपासह नियमित एसआयपी, प्रत्येक वर्षी थोडी गुंतवणूक वाढवणे, हाच संपत्ती निर्माणीचा खरा राजमार्ग आहे. इक्विटीसाठी फक्त मोठ्या कंपन्यांचा इंडेक्स फंड (निफ्टी ५०सारखा) पुरेसा आहे.

दरवर्षी एकदाच पोर्टफोलिओ पाहून लक्ष्याशी तुलना करा, आवश्यक असल्यास संतुलन साधा आणि लक्ष्य जवळ आले की इक्विटीचा हिस्सा हळूहळू कमी करा. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, गुंतवणुकीशिवाय एखादे छंद जोपासा. ह्यामुळे वारंवार पोर्टफोलिओशी खेळण्याची गरज भासणार नाही आणि गुंतवणूक शिस्तबद्ध राहील.

# परित्यक्त्या महिलांच्या अडचणी संदर्भात प्रशासनाशी समन्वय साधणार

**विनायक देशमुख यांची माहिती : सचिव आर विमला यांच्याशी चर्चा**

नगर – समाजातील परित्यक्त्या महिलांची संख्या मोठी असून दैनंदिन जीवनात त्यांना विविध समस्यांना सामोरे जावे लागते. त्यांच्या अडचणी संदर्भात आपण जिल्हा प्रशासनाशी समन्वय साधणार आहोत, अशी माहिती कौशल्य विकास समितीचे सदस्य व एकल महिला सक्षमीकरणासाठी कार्यरत विनायक देशमुख यांनी दिली.

महाराष्ट्र शासनाच्या सचिव व महिलांच्या समस्यांबाबत विशेष अभ्यास करणाऱ्या श्रीमती आर विमला या नुकत्याच अहिल्यानगर दौऱ्यावर आल्या होत्या. त्यावेळी श्री. देशमुख यांनी त्यांची भेट घेऊन त्यांच्याशी जिल्ह्यातील एकल महिला सक्षमीकरण कार्यक्रमाबाबत चर्चा केली.

श्रीमती आर विमला या महाराष्ट्र शासनाच्या सचिव असून सध्या नवी दिल्ली येथे निवासी आयुक्त (महाराष्ट्र सदन) या पदावर कार्यरत आहेत. महिलांच्या सक्षमीकरण कार्यक्रमात त्यांचा विशेष रस असून सध्या त्या परित्यक्त्या महिलांच्या समस्यांचा त्या अभ्यास करीत आहेत.



महाराष्ट्र शासनाच्या सचिव व महिलांच्या समस्यांबाबत विशेष अभ्यास करणाऱ्या श्रीमती आर विमला या नुकत्याच अहिल्यानगर दौऱ्यावर आल्या असता श्री. देशमुख यांनी त्यांची भेट घेऊन त्यांच्याशी जिल्ह्यातील एकल महिला सक्षमीकरण कार्यक्रमाबाबत चर्चा केली.

यावेळी श्री. देशमुख यांनी श्रीमती आर विमला यांचे अहिल्यानगर जिल्ह्यात स्वागत केले. जलसंपदामंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पा. यांच्या नेतृत्वाखाली व जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या मार्गदर्शनाने जिल्ह्यात सुरू असलेल्या एकल महिला सक्षमीकरण कार्यक्रमाबाबत श्रीमती विमला यांच्याशी चर्चा केली.

जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील एकल महिलांचे सर्वेक्षण पूर्ण झाले असून महापालिका क्षेत्रातील सर्वेक्षण काही दिवसातच पूर्ण होईल. त्यानंतर या महिलांच्या आवडीनुसार व उपजत कौशल्यानुसार त्यांना प्रशिक्षण देण्याचा प्रयत्न आहे. या प्रशिक्षणानंतर महिलांना आर्थिक सक्षमीकरणाच्या दृष्टीने रोजगार अथवा स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्यात येईल, असे श्री. देशमुख यांनी सांगितले.

श्रीमती आर विमला यांनी महिलांच्या विविध गटांच्या प्रतिनिधींशी चर्चा केली. महिलांनी यावेळी त्यांना प्रामुख्याने रेशन कार्ड, आधार कार्ड मिळण्याबाबत मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागते, असे सांगितले. त्यामुळे शासनाच्या विविध योजनांच्या लाभांपासून त्यांना वंचित राहावे लागत आहे, अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

महिलांच्या या समस्येबाबत आपण ना. विखे पा. व जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांच्याशी संपर्क साधून याबाबत आवश्यक ती उपाययोजना करण्याचा प्रयत्न करू. असे श्री.देशमुख यांनी सांगितले.

अडचणींबाबत महिलांनी विकासवर्धिनी, निर्मल चेंबर्स मागे, कॅड पॉइंट जवळ, लाल टाकी, अहिल्यानगर येथे अथवा ९४ २२ २२ २६ ९५ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन श्री. देशमुख केले.

यावेळी उमेद अभियानाचे सोमनाथ जगताप, सावली संस्थेचे नितीन बनसोडे, महिला बचत गटांच्या प्रतिनिधी व परित्यक्त्या महिला प्रतिनिधी उपस्थित होत्या.

# आय.आय.टी. रुरकीत नगर येथील आदित्य पितळे यांना पीएच.डी प्रदान



नगर – आय. आय. टी. रुरकी (IIT Roorkee) या संस्थेमध्ये डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी (Ph.D) ही पदवी आदित्य पितळे यांना ४ ऑगस्ट रोजी प्रदान करण्यात आली.

आदित्य पितळे यांनी प्रस्तावित प्रादेशिक परिवहन प्रणालीचा प्रदेशाच्या सुलभता, आर्थिक आणि प्रवास गतिमानतेवर होणाऱ्या परिणामाचा अंदाज या विषयावर त्यांचा प्रबंध सादर केला. त्यांचे पीएच. डी. चे कार्य नमो भारत ह्या रीजनल रॅपिड ट्रांजिट सिस्टम (RRTS) चा राजधानी दिल्ली व सभोवतालचे प्रादेशिक भागांवर (NCR) होणाऱ्या परिणामांसाठी उपयुक्त ठरणार आहे.

सदर प्रबंधाकरिता आदित्य पितळे यांना प्रा. शुभजित साधुखाँ व प्रा. मनोरंजन परिडा यांचे मार्गदर्शन लाभले.

आदित्य पितळे यांनी बी. टेक (प्लॅनिंग) कॉलेज ऑफ इंजिनीयरिंग, पुणे (COEP) येथून केले. तद्नंतर एम.टेक ची पदवी आय. आय. टी. रुरकीच्या इन्फ्रास्ट्रक्चर सिस्टीम या शाखेतून मिळवली व त्यासाठी सर्वोच्च गुणवत्तेचे सुवर्णपदक देखील मिळालेले आहे. तसेच त्यांना आय. आय. टी. रुरकीतील अभ्यासाच्या पूर्ण कालावधीसाठी प्रधानमंत्री रिसर्च फेलोशिप योजनेद्वारे शिष्यवृत्ती मिळाली होती. आदित्य हे उद्योजक मनीष पितळे यांचे चिरंजीव तसेच अडत बाजार व्यापारी असोसिएशनचे उपाध्यक्ष पेमराज पितळे व सी.ए. अशोक पितळे यांचे नातू आहेत.

# आनंदधाम येथे २० ऑगस्टपासून ‘पर्युषण महापर्व अष्टान्हीका पर्व’

**आठ दिवस विविध धार्मिक कार्यक्रमासह तप आराधना**



नगर – आनंदधाम येथे चातुर्मासानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम जप तप आराधना सुरू आहे. याअंतर्गत २० ते २८ ऑगस्ट दरम्यान पर्युषण महापर्व अष्टान्हीका पर्व साजरे केले जाणार आहे. महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी म.सा., आलोकऋषीजी म.सा., साध्वी दर्शनप्रभाजी म.सा., डॉ. अनुपमाजी म.सा. आदी ठाणा ८ यांच्या पावन सान्निध्यात व आशीर्वादाने या काळात विविध धार्मिक कार्यक्रम होणार आहेत.

पर्युषण महापर्व काळात दररोज सकाळी ६ ते ७ प्रार्थना, सकाळी ८.१५ ते ८.४५ यावेळेत अंतगड सूत्रे, सकाळी ८.४५ ते ९ यावेळेत पैसठिया यंत्र का चौमुखी जाप, सकाळी ९ ते १०.१५ यावेळेत प्रवचन होणार आहे.

दुपारी २.३० ते ३.३० यावेळेत कल्पसूत्र वाचन, दुपारी ३.३० ते ४ यावेळेत विविध स्पर्धा आणि सूर्यास्तावेळी प्रतिक्रमण होणार आहे. पर्युषण काळात दररोज विविध तप आराधना, पौषध, उपवास आयंबिल, एकासनाचे आयोजन करण्यात आले आहे. याशिवाय ५ ते १२ वर्ष वयोगटातील मुलामुलींसाठी प्रतिक्रमण होणार आहे. २७ ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजता संवत्सरी आलोयना होणार आहे. २८ ऑगस्ट रोजी सकाळी ७ पासून सामुहिक क्षमापना कार्यक्रम होईल.

पर्युषण महापर्व आत्मशुद्धीचे पर्व आहे. मनातील राग द्वेष दूर करून हृदय परिवर्तन या काळात केले जाते. श्रावक श्राविकांनी या कार्यक्रमात नित्यनेमाने सहभागी व्हावे, असे आवाहन श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघाने केले आहे.



आगरकर मळा येथील ललित बनभेरू यांच्या निवासस्थानी चातुर्मासानिमित्त पैंसठिया छंद जाप अनुष्ठान कार्यक्रमामध्ये सर्व परिवाराने जिनशासन प्रभावना केली.

# आगरकर मळा येथे बनभेरू यांच्या निवासस्थानी पैंसठिया छंद जाप अनुष्ठान कार्यक्रम

नगर – आगरकर मळा येथील जैन स्थानकात चातुर्मासानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम, जप तप आराधना सुरू आहे. गुरुणीमैय्या प्रभाकंवरजी म.सा. यांच्या शिष्या, मधुरी कंठी जिनशासन प्रभाविका, अनुप्रेक्षाजी म.सा. आदि ठाणा ३ यांच्या सान्निध्यात पैंसठिया छंद जाप अनुष्ठान कार्यक्रम होत आहे. आगरकर मळा येथील ललित प्रतिक बनभेरू यांच्या निवासस्थानी सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत ११ तास महा चमत्कारिक पैंसठिया छंद जाप करून संपूर्ण परिवाराने जिनशासन प्रभावना केली.

अनुप्रेक्षाजी म.सा. म्हणाल्या की, पैंसठिया छंद २४ तिर्थंकर भगवानांची स्तुति जाप करून पुण्य प्राप्ती होते. समाजात घरोघरी धार्मिकता वाढली तर परिवाराला सुख समाधान समृद्धी प्राप्त होते. चातुर्मास आत्मशुद्धीचे पर्व आहे. प्रत्येकाने जप तप करून हृदय परिवर्तनाची अनुभुती घेतली पाहिजे.

आगरकर मळा श्रावक संघाचे अध्यक्ष अभय कोठारी म्हणाले की, बनभेरू परिवारासारखे अनेक परिवार प्रत्येक धार्मिक कार्यक्रमात सहभाग नोंदवत असतात. चातुर्मासात विविध धार्मिक कार्यक्रम होत असून भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. घरोघरी भाविक आवर्जून पैंसठिया छंद जाप करून जिनशासन प्रभावना करत आहेत.

ललित बनभेरु म्हणाले, यंदाच्या चातुर्मासात घरी पैसंठिया छंद जाप करण्याचे भाग्य लाभले. अनुप्रेक्षाजी म.सा. यांच्या पावन आशीर्वादाने जाप करता आला. त्यामुळे घरात सकारात्मक ऊर्जा प्राप्त झाली तसेच मनालाही प्रसन्नता मिळाली. श्रावक संघाने यंदा चातुर्मासाचे उत्तम नियोजन करून भाविकांना पर्वणी मिळवून दिली.

सचिव प्रमोद गदीया म्हणाले, चातुर्मासातील सर्व कार्यक्रम उत्साहात पार पडत आहेत. प्रत्येकजण सहकुटुंब जप तप, उपवास करून गुरू भगवंतांची शिकवण आचरणात आणत आहे. ६५ दिवस वेगवेगळ्या परिवाराकडून जाप होत आहे. नवीन पिढीवर धार्मिकतेचे चांगले संस्कार होत असून चातुर्मास संस्मरणीय ठरत आहे.

# दि इन्स्टिट्युशन ऑफ इंजिनिअर्स, अहमदनगर केंद्रातर्फे इंजिनिअरींग अवार्डस् (अभियंता पुरस्कार) साठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन

नगर – थोर अभियंता भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या जयंती निमित्त दर वर्षी १५ सप्टेंबरला अभियंता दिना च्या दिवशी दि इन्स्टिट्युशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया) च्या अहिल्यानगर केंद्रातर्फे जिल्ह्यामधील विविध क्षेत्रांमध्ये कार्यरत असलेल्या व आपल्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या अभियंत्यांना अभियंता पुरस्कार देण्यात येतात. अभियंता दिना निमित्त आयोजित विशेष समारंभात, स्मृतिचिन्ह व मानपत्र देऊन पुरस्कार प्राप्त अभियंत्यांना सन्मानित करण्यात येते.

अभियंता दिनानिमित्त संस्थेतर्फे दिल्या जाणाऱ्या विविध पुरस्कारांमध्ये खालील पुरस्कारांचा समावेश असतो.

आऊटस्टँडींग इंजिनिअर अवार्ड, इंजिनिअरींग अचिव्हमेंट अवार्ड, प्रॉमिसिंग इंजिनिअर अवार्ड, व लेडी इंजिनिअर अवार्ड या वर्षीच्या अभियंता पुरस्कारांसाठी जिल्ह्यातील विविध औद्योगिक, शैक्षणिक, सरकारी व खासगी कार्यालयांकडुन, तसेच इतर अभियंत्यांनी व्यक्तीगत स्वरूपात विहित नमुन्यामध्ये नामनिर्देशन करण्याचे आवाहन संस्थेचे अध्यक्ष भारतभूषण भागवत व मानद सचिव डॉ. दीपक विधाते यांनी केले आहे.

पुरस्कारांसाठीचे नामांकन अर्ज व मार्गदर्शक प्रणाली संस्थेच्या अभियंता भवन, जिजाऊनगर, कल्याण रोड, अहिल्यानगर येथील कार्यालयात उपलब्ध आहेत. नामनिर्देशन अर्ज स्वीकारण्याची शेवटची तारीख २६ ऑगष्ट अशी आहे.

अधिक माहितीसाठी दूरध्वनी क्र. २३२३३५९ किंवा मो. क्र. ९४२२३०५६७४ व ९०२८०२७७०७ वर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# सराफ व्यावसायिकाची ३.२६ कोटी रुपयांची फसवणूक करणाऱ्याला गुजरातमध्ये पकडले

नगर – शिर्डीत एका सराफ व्यावसायिकाची कोट्यावधी रुपयांची फसवणूक करणार्या आरोपीला शिर्डी पोलिसांनी गुजरात राज्यातील बडगावमधून अटक केली आहे. या आरोपीने व्यावसायिकाकडून ३ कोटी २६ लाख रुपयांचे दागिने आणि रोख रक्कम चोरून नेली होती. आरोपीने स्वतःला ड्रायव्हर असल्याचे भासवून ही फसवणूक केली होती.

मूळचे बनसकाठा (गुजरात) येथील असलेले, शिर्डी येथे सराफ व्यवसायाशी संबंधित असलेले व्यापारी विजयसिंग वसनजी खिसी यांनी फिर्याद दाखल केली होती. त्यांनी शिर्डी, श्रीरामपूर, कोल्हार, सोनई आणि अहिल्यानगर येथील सराफ व्यावसायिक आणि ग्राहकांकडून सोने विक्रीसाठी आणले होते. याचदरम्यान १३ मे रोजी त्यांचा ड्रायव्हर सुरेशकुमार भुरसिंग राजपुरोहित (रा. चोहटन, जि. बारमेर, राजस्थान) याने शिर्डी येथील हॉटेल साई सुविधा येथे मुक्कामी असताना ३ कोटी २६ लाख रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम चोरून पलायन केले.



सराफ व्यावसायिकाची ३.२६ कोटींची फसवणूक करणाऱ्याला गुजरातमध्ये पकडल्यानंतर त्याच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

या घटनेची तक्रार मिळाल्यानंतर शिर्डी पोलीस स्टेशनमध्ये बीएनएस कलम ३०६ आणि ३१६ (२) प्रमाणे चोरीचा गुन्हा दाखल केला. घटनेचे गांभीर्य लक्षात घेत, शिर्डी पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखेने तातडीने तपासाला सुरुवात केली. पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कवडी यांच्या नेतृत्वाखाली एक विशेष पथक तयार करण्यात आले. या पथकात पोलीस उपनिरीक्षक अनंत सालगुडे, पोलीस अंमलदार अमृत आढाव, भगवान थोरात, प्रशांत राठोड यांचा समावेश होता.

या विशेष पथकाने तांत्रिक आणि गोपनीय माहितीच्या आधारे तपास सुरू केला. त्यांना मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी सुरेशकुमार भुरसिंग राजपुरोहित हा गुजरात राज्यात लपून बसल्याची माहिती मिळाली. त्यानुसार शिर्डी पोलिसांनी गुजरात पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या मदतीने त्याला गुजरातच्या साबरकाटा जिल्ह्यातील तलोद येथून ताब्यात घेतले. आरोपीला पुढील तपासकामी शिर्डी पोलीस स्टेशन येथे हजर करण्यात आले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास शिर्डी पोलीस करत आहेत.

# ऑलिम्पियाडमध्ये उस्मान खान महाराष्ट्रात प्रथम




नगर – इंडियन टॅलेंट ऑलिम्पियाड स्पर्धेत उस्मान रिजवान खान हा महाराष्ट्रात प्रथम आला आहे. त्याला ट्रॉफी, सर्टिफिकेट व १२०० रुपये रोख देऊन विद्यालयातील कुलकर्णी मॅडम यांच्या हस्ते त्याचा सत्कार करण्यात आला.उस्मान हा व्हॅल्यू व्ह्यू या इंग्रजी शाळेत इयत्ता दुसरीमध्ये शिकत आहे. पत्रकार सरवर तांबटकर यांच्या भाच्याचा तो मुलगा आहे.



चक्रधर स्वामी प्राथमिक विद्यालयात दहीहंडी उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला.

# चक्रधर स्वामी प्राथमिक विद्यालयात दहीहंडी उत्सव उत्साहात

नगर – नागापूर येथील चक्रधर स्वामी प्राथमिक विद्यालयात दहीहंडीचा उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने, शाळेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी श्रीकृष्ण आणि राधेची वेशभूषा करून सर्वांचे मन जिंकले. या कार्यक्रमा साठी सांस्कृतिक विभाग प्रमुख श्रीमती कोकाटे मॅडम आणि मुख्याध्यापिका श्रीमती कासार मॅडम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाला सर्व शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना दहीहंडी उत्सवाचे महत्त्व आणि श्रीकृष्णाच्या जीवनातील काही प्रसंगांची माहिती दिली.

विद्यार्थ्यांमध्ये उत्साह वाढवण्यासाठी या वेळी विविध गाणी आणि नृत्याचे कार्यक्रमही सादर करण्यात आले. सर्व शिक्षक आणि कर्मचाऱ्यांनी या कार्यक्रमासाठी मेहनत घेतली, ज्यामुळे हा सोहळा यशस्वीरित्या पार पडला.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत विक्रीचा व्यवहार आमचे अशिलांबरोबर ठरलेला आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे असे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते की, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द **झालेपासून ७ दिवसांचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांच्या नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहे त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुरा करतील. मग कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

**ही नोटीस प्रसिध्दीस दिली. ता. १८/०८/२०२५**

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन**

**मिळकत वर्णन :** जिल्हा अहिल्यानगर, पोटतुकडी नगरपैकी, **जिल्हा परिषद हद्दीतील, मौजे जखणगांव येथील** खालील वर्णनाची मिळकत –

| गट नंबर | हे.आर | रु.पै. |
|---|---|---|
| १७३/२ | १.३७ | १.०१ |
| | + पो.ख ०.०३ | |
| | एकुण १.४० | |

ही संपुर्ण शेतजमीन मिळकत व सदर गटातील असलेले विहीर पाणी, आंब्याची झाडे, शेत-तळ्यासह तसेच सदर गटामधील सर्व फळझाडे, बांधकामासह तसेच तदंगभुत वस्तु सह.

**यांसी चतुःसीमा –**

पूर्वेस : गट नं.१७३/५ दक्षिणेस : मौजे पिंपळगांवची शिव
पश्चिमेस : गटनं.१७३/२ व १७३/३ उत्तरेस : रस्ता

**सदर मिळकतीचे विद्यमान मालक–**
**१. सागर बाळकृष्ण खांडरे**
**२. ऋषिकेश ज्ञानेश्वर खांडरे**
**३. चैतन्य एकनाथ खांडरे**
**सर्व रा.शिवगंगा सदन, १४४४/४७,वंजार गल्ली, अहिल्यानगर.**

**ॲड. आर.टी.शर्मा**
फोन : २३४११०६, मो.नं.९४२२२२०८४५
ऑफीस नं. १४,१७ पहिला मजला
श्री आनंद कॉम्प्लेक्स, दाळमंडई, अहिल्यानगर

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमूद केलेली मिळकत ही मिळकतीचे विद्यमान मालक **१. मोहसीन अहमद कासीम शेख, २. समीना बानू अयाज खान, ३. निलोफर अब्दुल वाहिद शेख, ४. मुबीना अब्दुल वहाब खान, ५. तहसीन राजमोहम्मद शेख, ६. शमीम सिराज शेख, ७. कामरान सिराज शेख, ८. इम्रान सिराज शेख, ९. तबस्सुम नाझ W/o मोहम्मद अब्दुल नाझर, १०. अंजुम सादिक बेग, ११. तरन्नुम फिरोज शेख, १२. हलीमा निसार शेख, १३. राजमोहम्मद निसार शेख, १४. झुबेर निसार शेख, १५. रिजवाना शोएबुद्दीन पटेल, १६. शबनम युसुफ शेख, १७. अफरीन मतीन शेख, १८. खलील इब्राहीम शेख, १९. तन्वीर शब्बीर मिर्झा बेग, २०.जुनेद फिरोज खान, २१. परवेज फिरोज खान, २२. फरहात तन्वीर मिर्झा बेग, २३. मतीन कासिम शेख, सर्व रा. गोवर्धन अपार्टमेंट समोर, आंबेडकर रोड, माळीवाडा, अहमदनगर.** यांच्या वडिलोपार्जित मालकी वहिवाटीची मिळकत असून त्यांचे प्रत्यक्ष कब्जात आहे. सदर मिळकतीचे विद्यमान मालक व आमचे अशिल यांचे दरम्यान सदर मिळकतीचे विक्रीबाबत बोलणी होऊन मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांकडून विसारादाखल रक्कम स्वीकारुन सदर मिळकत आमचे अशिलास खरेदी देण्याचे मान्य व कबूल केले आहे व त्याप्रमाणे सदर मिळकतीच्या खरेदीखताचा व्यवहार लवकरच होणार आहे. सदर मिळकतीवर इतर कोणाचाही बोजा नसून सदर मिळकत ही निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची असून त्यामध्ये दुसऱ्या कोणाचाही कोणत्याही प्रकारे कसलाही बोजा, मालकी हक्क हितसबंध अगर कब्जा नाही अशी मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलास खात्री दिली असून भरोसा दिलेला आहे. तथापी सदर मिळकतीमध्ये इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, भाडेपट्टा, खरेदीखत, साठेखत, वारसा हक्क, कुळ वहिवाट इत्यादी कोणत्याही प्रकारचा कसलाही मालकी हक्क हितसबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून **७ दिवसांचे आत** लेखी स्वरुपात कागदपत्रानिशी आमची खात्री पटवावी अन्यथा सदर मिळकत ही निर्वेध व निजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील, नंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट** : डिस्ट्रीक्ट अहमदनगर, सब डिस्ट्रीक्ट ता. नगर पैकी, येथील अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील **टि.पी.स्कीम नं.३ मधील फायनल प्लॉट नं. २१०/२ चे क्षेत्र ९१.३१ चौ.मीटर अशी संपूर्ण खुली प्लॉट मिळकत यांसी** चतु:सिमा खालीलप्रमाणे :-

पुर्वेस :- ९ मीटर रुंदीचा रस्ता दक्षिणेस :- फायनल प्लॉट नं. २१०/३
पश्चिमेस :- फायनल प्लॉट नं. २१०/१ उत्तरेस :- सिटी सर्व्हे नं. ७१८७

येणेप्रमाणे चतु:सिमापूर्वक खुली प्लॉट मिळकत त्यामधील, तद्ंगभुत वस्तुसह, वागवहिवाटीचे हक्कांसह काही एक राखुन न ठेविता.

अहमदनगर
ता.१८/०८/२०२५

**ॲड. फिरोदिया आनंद आर**
ऑफिस – ११९, अंबर प्लाझा ए बिल्डींग
एस.टी. स्टॅण्डजवळ अहमदनगर
मो : ९८९०६१५२५३


मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# संजीवनी हाउसिंग कॉलनीच्या अध्यक्षपदी श्रीकृष्ण लांडगे तर सचिवपदी अभय ललवाणी





नगर – रेल्वे स्टेशन मल्हार चौक परिसरातील संजीवनी हाऊसिंग कॉलनीच्या अध्यक्षपदी श्रीकृष्ण लांडगे यांची तर सचिवपदी अभय ललवाणी यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

कॉलनीतील प्लॉट मालक सदस्यांची बैठक ज्येष्ठ सदस्य शांतीलाल गुगळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. अध्यक्षपदासाठी श्रीकृष्ण लांडगे यांच्या नावाची सूचना शांतीलाल गुगळे यांनी तर सचिव पदासाठी अभय ललवाणी यांच्या नावाची सूचना अशोक चुडीवाल यांनी मांडली. उपस्थित सर्व सदस्यांच्या संमतीने ही निवड करण्यात आली.

यावेळी कॉलनीच्या ज्येष्ठ सदस्या सौ. पाटील, सुरेश चांडक, विनय बिनायके, सुनील जोशी, राजेंद्र शिपणकर, चंद्रकांत शिपणकर, प्रशांत मते, किशोर बळे, वीरू नगरकर, राजेंद्र बळे, युवराज जाधव आदी सदस्य उपस्थित होते.


## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेली मिळकत विद्यमान मालक **अजीज गुलाब मणियार रा.तुपे वस्ती,उरुळी कांचन पुणे,** यांचे मालकी हक्काची व वहिवाटीची असून विद्यमान मालक यांनी आमचे अशिलांबरोबर कायमखुष खरेदी देण्यांचे ठरविले असुन सदर मिळकत ही निर्वेध निजोखमी व बोजारहीत, असल्याची विश्वास व भरवसा आमचे अशिलांस दिलेला आहे. या उपरही सदर मिळकती बाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, मनाई, दावा,लिज, गहाण, दान,बक्षिस,पोटगी हक्क, सोसायटी राईटस व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यांस त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन **७ दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडून दिले आहे असे समजण्यांत येईल.

**परिशिष्ट : मिळकत वर्णन :** डि।।अहिल्यानगर/अहमदनगर सब.डि ।। ता. नगर पैकी अहिल्यानगर/अहमदनगर जिल्हा परिषद हद्दीतील **मौजे नागरदेवळे** येथील **सर्व्हे नंबर १०३/१०४** मे.दु.निबंधक साहेब, अहमदनगर यांचे कक्षेतील खुल्या प्लॉट मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे –

| प्लॉट नं. | क्षेत्रफळ चौ.मीटर | यांसी चतु:सीमा | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | पूर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| ७७ | १७६.०० | प्लॉट नं.९७ व ९८ | प्लॉट नं.७८ | १२.०० मीटर रस्ता | सर्व्हे नं.१११ |
| **या संपूर्ण प्लॉट मिळकतीबाबत.** | | | | | |

येणेप्रमाणे चतु:सिमापूर्वक काही एक राखून न ठेविता.

दि.१८/०८/२०२५
अहमदनगर

**ॲड. नाजीम अहमद इस्माईल शेख**
**ॲड. कुरेशी फैजान फारुक**
जीपीओ रोड,कलेक्टर ऑफिसशेजारी, डावरेगल्ली,
अहमदनगर, मो : ९८८१४३१८६०,७२७६२५२४७८




मैत्रेयी भावे हिला पारितोषिक देवून सन्मानित करण्यात आले.

# मैत्रेयी भावे हिचे नृत्य स्पर्धेत यश

नगर – नांदेड येथे झालेल्या सप्तरंग कल्चरल फेस्टीव्हल, मिनिस्ट्री ऑफ इंडिया अंतर्गत झालेल्या शास्त्रीय नृत्य स्पर्धेच्या मोठ्या गटात नृत्यदर्पण नृत्य अकादमीच्या मैत्रेयी अनिकेत भावे हिला तिसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. या ट्रस्टच्या सानवी जेठवानी (नांदेड) यांच्या हस्ते पारितोषिक मिळाले. या स्पर्धेसाठी विविध राज्यातून स्पर्धक आले होते.

मैत्रेयी हिने तिच्या नृत्य शिक्षिका सौ. अपर्णा रोहित थत्ते यांनी शिकविलेल्या शिवकिर्तनम् या भरतनाट्यम् नृत्य प्रकारावर सादरीकरण करुन रसिक प्रेक्षकांची मने जिंकली व तृतीय क्रमांक मिळविला आहे.

